# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 10 | Marathi Monthly | Thane, 1 April 2024 to 30 April - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# निवडणूक आयोग हे, मोदी-शहांचं बटिक!

## ईव्हीएमविरोधी जनजागृती आंदोलनात, राजन राजेंचा ठाण्यात जोरदार घणाघात...




**लोकसभा आणि विधानसभा निवडणुका तसेच, भविष्यातील आगामी सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मतदानाची प्रक्रिया ही, ईव्हीएमवर न घेता, ती मतपत्रिकेवर घेण्यात यावी त्याबाबत, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने शुक्रवार, दि. ०१ मार्च-२०२४ रोजी, भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष अशी सर्वमान्य ओळख असलेल्या 'धर्मराज्य पक्षा'ने लोकशाही आणि सनदशीरमार्गाने, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आंदोलन पुकारले होते.** आजघडीला ईव्हीएमद्वारे घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांना विरोध वाढतच चालला असून, देशभरात असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. ईव्हीएमवर संशय असल्यानेच, ''मतदान-पत्रिका नाही; तर, निवडणूक नाही'' असा निर्धार व्यक्त करीत, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील शासकीय विश्रागृहाबाहेर 'धर्मराज्य पक्षा'ने हे जनजागृती आंदोलन पुकारले होते. पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वंदनाताई शिंदे आवर्जून उपस्थित होत्या. **याप्रसंगी, उपस्थित आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना, राजन राजे म्हणाले की, ''संविधानकारांनी पसंतीचे लोकप्रतिनिधी, सरकार निवडण्यासाठी आणि अपयशी राज्यकर्त्यांना बदलण्यासाठी मतदानाचा अधिकार देऊन, भारतीय जनतेला सामर्थ्यवान बनवलं आहे. मात्र, राज्यकर्त्यांनी ईव्हीएमला मतदानाचा अधिकार निष्प्रभ करणारे हत्यार बनवलं आहे. ईव्हीएम म्हणजे, साधे मतदान यंत्र नसून, एकप्रकारचे जनतेतील असंतोष आणि सरकारविरोधी जनमत उखडून फेकणारे जेसीबी मशीनच आहे. सरकारबद्दल जनतेत तीव्र नाराजी असताना, सत्ताधारी पक्षाला विक्रमी बहुमत मिळण्याचा चमत्कार, केवळ ईव्हीएममुळेच घडून आलेला आहे. निवडणूक आयोग हे, मोदी-शहांचं बटिक तर आहेच; मात्र, त्याचबरोबर देशातील सर्व स्वायत्त संस्था मोदी-शहा सरकारने आपल्या ताब्यात घेतलेल्या आहेत.** जर्मनीचा हिटलर आणि इटलीचा मुसोलिनी यांचा अस्त झाल्यानंतर, ...*पृष्ठ क्र. २ वर*

## जगण्याचा क्रूर खेळ मांडणारी, 'भांडवली-मांडवली' व्यवस्था!



**'भारत जोडो न्याय यात्रे'दरम्यान राहुल गाधी, ठाणे-मुंबई मुक्कामी विविध लहानमोठ्या संघटनांच्या-पक्षांच्या प्रतिनिधींना भेटले...मात्र, ठाण्यातील काही नतद्रष्ट राजकारण्यांच्या कारस्थानी-कलुषित वृत्तीमुळे राहुल गांधींची आणि माझी ठरवूनही प्रत्यक्षात भेट होऊ शकली नाही. तरीही, त्यांच्यापर्यंत खालीलप्रमाणे असलेलं, आपलं महत्त्वपूर्ण 'निवेदन' पोहोचवण्यात आलेलं आहे. केवळ, एक नवजात छोटेखानी पक्षप्रमुख म्हणून नव्हे; तर, चार दशकांहून अधिककाळ कार्यरत असलेल्या जातिवंत-जाज्वल्य अशा...***पृष्ठ क्र. ८ वर*

## माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या आमरण उपोषणाला 'धर्मराज्य पक्षा'चा पाठिंबा!


### मा. राजन राजे यांनी घेतली उपोषणकर्त्या आंदोलकांची भेट...

**'माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ' या आरटीआय कार्यकर्त्यांच्या राज्यव्यापी संघटनेच्या वतीने, ठाणे जिल्हा (ग्रामीण) अध्यक्ष श्री. शंकर वडवले यांच्या नेतृत्त्वाखाली, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण सुरु केले असून, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, दि. ४ मार्च-२०२४ रोजी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन, त्यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शविला.** ठाणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील काम...*पृष्ठ क्र. २ वर*


अंतरंग




तुम्हाला खरंच देश वाचवायचा आहे का...???
...ज्ञानेश वाकुडकर
पृष्ठ क्र. ४



Electoral Bonds Data: Out of Top 30 Donors, 14 Were Raided by Probe Agencies
Data released by the ECI reveals action by ED, CBI, and IT officials on at least 14 out of top 30 donor companies.
HIMANSHI DAHIYA
Published: 15 Mar 2024, 1:26 AM IST

फ्युचर गेमिंग अँण्ड हॉटेल सर्विसेस आणि इलेक्टोरल बाँण्डस खरेदी...
...सुनील तांबे
पृष्ठ क्र. ९




'पुनर्वाचना'साठी... आपल्या 'लायकीचे' सरकार 'आपल्याला' मिळते!
- संजय पवार
पृष्ठ क्र. १०

# निवडणूक आयोग हे, मोदी-शहांचं बटिक!

...पृष्ठ क्र. १ वरुन




त्या देशांतील हुकूमशाही संपली असली तरी, भारतावरील फार मोठा धोका आपल्याला वेळीच ओळखता आला पाहिजे. **भविष्यात मोदी-शहा भाजपाई सरकारचा पाडाव झाला; तरी, कृपा करुन कोणीही भ्रमात राहू नये की, देशात तात्काळ लोकशाहीचा जागर सुरु होईल. याचं कारण असं की, भारतात धनदांडग्या भांडवलदारांची फार मोठी लॉबी कार्यरत आहे. आपल्याला हे वेळीच ओळखून, सावधपणे पावले टाकणे गरजेचे आहे'' असा जोरदार घणाघात करीत, ते पुढे म्हणाले की, ''जगातील १९४ देशांपैकी १२० देशांमध्ये, निवडणुका मतदान पत्रिकेद्वारेच होतात. इटली, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, आयर्लंड, नेदरलँड आदी देशांनी ईव्हीएमपद्धती बंद करुन, मतदान पत्रिकेचा स्वीकार केलेला आहे. मग, एखाद्या कंपनीचा निकृष्ट माल विकण्यासाठी त्यांचे 'मार्केटिंग एजंट' (दलाल विक्रेते) जसा जीवाचा आटापिटा करतात; तसा, करदात्यांचा पैसा खर्च करुन एतच मशिन्स निर्दोष असल्याची जाहिरातबाजीद्वारे बतावणी करण्याचा निवडणूक-आयोगाचा अट्टाहास कशासाठी?'' असा थेट सवाल राजन राजे यांनी यावेळी प्रशासनाला विचारला.**

दरम्यान, ईव्हीएमद्वारे केल्या जाणाऱ्या मतदानाबाबतचा संशय दूर करण्यासाठी, व्हीव्हीपीटी स्लिप मिळण्याची व्यवस्था करण्यात आलेली असली तरी, निकाल वादग्रस्त ठरल्यास, त्या स्लिप मोजण्याची परवानगी मात्र देण्यात आलेली नाही, याकडे लक्ष वेधून, **उपस्थितांना संबोधित करताना राजन राजे पुढे म्हणाले, ''निवडणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएममध्ये हेराफेरी करणे सहज शक्य आहे. लोकशाही वाचवायची असेल तर, ईव्हीएम हद्दपार करावीच लागेल... अन्यथा, तत्झअढ स्लिप, ही प्रत्यक्ष मतदारांच्या हातात आली पाहिजे व मतदारांनीच ती स्वत:च्या हाताने मतपेटीत टाकली पाहिजे; तसेच, निवडणुकीचा निकाल, हा त्याआधारेच लागायला हवा!**

**असल्याशिवाय, देशात सत्तांतर शक्य नाही. भाजपने २०१९च्या निवडणुकीत ३००च्या पुढे जागा जिंकण्याचा नारा दिला होता आणि ३०३ जागा जिंकून तो खरा करुन दाखवला.** आता त्यांनी, ४०० पारचा नारा दिलाय. देशातील ८० टक्के जनतेत असंतोष खदखदत असताना, भाजप ठरवेल तितक्या जागा जिंकण्याचा आत्मविश्वास ईव्हीएमच्या माध्यमातूनच

**उल्लेखनीय बाब म्हणजे, ज्या जपानमध्ये ईव्हीएमच्या चिपची निर्मिती केली जाते, त्याच जपान देशात निवडणुकांसाठी मशीनचा वापर केला जात नाही, याचीही आठवण राजे यांनी आपल्या भाषणातून करुन दिली. ''२०२४ हे निवडणुकांचे वर्ष म्हणून गणले जाणार आहे. या अनुषंगाने निवडणूक आयोगाने कसून, ईव्हीएम जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. ईव्हीएमविरोधी आंदोलन ही, देशातील लोकशाही वाचविण्याची लढाई आहे. ईव्हीएमच्या जागी मतपत्रिका** येत असून, कोणतेही बटण दाबले की, मत कमळाला जाते...अशा संशयामुळे मतदानाच्या प्रक्रियेबाबत ईव्हीएममुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. **निवडणुकीत ईव्हीएमचे प्रोग्रामिंग करता येत असल्याने, लोकशाही धोक्यात आलेली आहे. म्हणूनच सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण होण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'ने सदर आंदोलन पुकारुन, ईव्हीएमविरोधातील हा लढा आता, संपूर्ण राज्यात उभारला जाईल'' असा ठाम निर्धार यावेळी**



**'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी बोलून दाखवला. दरम्यान, आंदोलनानंतर, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना पत्र देण्यात येऊन, केंद्रीय निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक आयुक्तांनाही, पत्र पाठविण्यात आल्याची माहिती, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी** प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

## माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या आमरण उपोषणाला 'धर्मराज्य पक्षा'चा पाठिंबा!

...पृष्ठ क्र. १ वरुन

वाटपातील मनमानी कारभाराविरोधात सदर आमरण उपोषण सूरु करण्यात आल्याचे, संघटनेचे अध्यक्ष श्री. शंकर वडवले यांनी यावेळी सांगितले. या भ्रष्ट कारभाराविरोधात, जानेवारी-२०२३पासून ते आजमितीपर्यंत झालेल्या काम वाटपामध्ये, तत्कालीन उप-कार्यकारी अभियंता यांनी, मोठ्याप्रमाणात गैरव्यवहार केले असून, यासंदर्भात वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करुनही, संबंधित विभागाचे अधिकारी हे, मनमानी कारभार करीत असल्याची माहिती, श्री. शंकर वडवले यांनी दिली. दरम्यान, **'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी यावेळी आंदोलनकर्त्यांशी बोलताना म्हटले की, ''सध्या संपूर्ण शासकीय व्यवस्था ही भ्रष्टाचाराने पोखरलेली असून, महाराष्ट्रातील मिंधे सरकार आणि देशाचे मोदी-शहा या जोडगोळीचे केंद्र सरकार, हुकूमशाही व दडपशाहीचा कारभार**



**करीत असल्यानेच, अवघी प्रशासकीय व्यवस्था रसातळाला गेलेली आहे. 'माहितीचा अधिकार' हा कायदा म्हणजे, लोकशाहीमार्गाने लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हातातील शस्त्र असून, सनदशीरपणे आपण आपला संघर्ष केला पाहिजे. संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला आंदोलनाचा अधिकार दिलेला आहे; मात्र, महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार, जनतेचे आंदोलन चिरडून टाकण्यातच मर्दुमकी गाजवत आहेत. तुमची बाजू सत्याची असेल तर, मी व्यक्तिश: आणि माझा 'धर्मराज्य पक्ष' आपल्या पाठीशी ठामपणे उभा राहील!'' अशी ग्वाही मा. राजन राजे यांनी यावेळी उपोषणकर्त्या आंदोलकांना दिली.** याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. नरेंद्र पंडित, पक्षाचे कार्यकर्ते श्री. संजय दळवी आणि श्री. युवराज पवार आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईतील व्यंकटेश्वर मंदिराच्या माध्यमातून, वैद्यकीय महाविद्यालय आणि आरोग्य केंद्र उभारण्यात यावे !


## 'धर्मराज्य पक्षा'ची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी...

**ठाणे (प्रतिनिधी) :** नवी मुंबईतील उलवे नोड येथे, व्यंकटेश्वर (बालाजी) मंदिर उभारणीसाठी, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, सिडको प्रशासनाने तिरुमला देवस्थान ट्रस्टला यापूर्वीच दहा एकराचा भूखंड नाममात्र दर आकारुन, भाडेतत्त्वावर दिलेला असतानाच, आता याच नियोजित मंदिराच्या शेजारी, पद्मावती मंदिराच्या उभारणीसाठी, आणखी पाच एकराचा अतिरिक्त भूखंड राज्य शासनाने मंजूर केल्याचे वृत्त प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झालेले आहे. याच पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय यांना पत्राद्वारे अवगत करुन दिले आहे की, व्यंकटेश्वर मंदिर निर्मितीच्या माध्यमातून, वैद्यकीय महाविद्यालय तसेच, उलवे आणि पनवेल परिसरातील स्थानिक जनतेसाठी, आरोग्य केंद्र उभारण्यात यावे याबाबतचे पत्र, (धराप/मुमं/मरा/मुंबई/२०२२/१७) महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना, दि. २३/०४/२०२२ रोजी देण्यात आले होते. त्यावर, राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या दि. १७/०८/२०२२ रोजीच्या पत्रात, वैद्यकीय महाविद्यालय उभारणीसंदर्भातील निर्णय हा, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या अखत्यारीत येत असल्याचे उत्तर देण्यात आले होते. याच अनुषंगाने 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय यांना, दि. ०९/०९/२०२२ रोजी पत्रव्यवहार (धराप/सचिव/वैशिऔद्रवि/मशा/मुंबई/२०२२/४२) करुन, नवी मुंबईतील उलवे नोड येथील व्यंकटेश्वर मंदिर निर्मितीच्या माध्यमातून, वैद्यकीय महाविद्यालय तसेच, आरोग्य केंद्र उभारण्यात यावे अशी आग्रही मागणी केली होती. मात्र, या दोन्ही पत्रांना दोन वर्षांचा कालावधी उलटूनदेखील, त्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने विचार तर केला नाहीच, उलटपक्षी तिरुमला देवस्थान ट्रस्टला, व्यंकटेश्वर मंदिरासाठी, आधीच दहा एकराचा भूखंड दिलेला असताना, आता पुन्हा एकदा पद्मावती मंदिराच्या उभारणीसाठी, पाच एकराचा अतिरिक्त भूखंड बहाल करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे, धार्मिक प्रयोजनासाठी दोन हजार चौरस मीटर क्षेत्रफळापेक्षा अधिक आकारमानाच्या भूखंड वाटपाचे सिडको प्रशासनाचे निश्चित धोरण नसल्याने, याप्रकरणी शासनाचे निर्णय घ्यावा, अशी विनंती सिडकोकडून नगरविकास विभागाला करण्यात आली होती. शिवाय हा भूखंड, सीआरझेडमध्ये मोडत असल्यामुळे, पर्यावरणप्रेमींनी हरित लवादाकडे तक्रार दाखल केलेली आहे. दरम्यान, हा भूखंड वादात सापडलेला असतानाही, महाराष्ट्र शासनाने खिरापत वाटल्यासारखा, अतिरिक्त पाच एकराचा भूखंड संबंधित देवस्थान ट्रस्टला देऊन आपले औदार्य दाखविलेले असले तरी, याच मंदिराच्या माध्यमातून सर्वसामान्य स्थानिक भूमिपुत्र गोरगरीब जनतेसाठी, आरोग्य केंद्र उभारण्यात यावे असे मात्र, महाराष्ट्राच्या मायबाप गतिमान सरकारच्या ध्यानीमनीही येऊ नये, यासारखी दुसरी दुर्दैवाची बाब ती कोणती? असा संतप्त सवाल 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात थेटपणे उपस्थित केला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता, कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू होऊ शकते, याचा विचार करुन, महाराष्ट्र शासनाने विकासकामांच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि शहरे व मुंबईतील उपनगरीय रेल्वे स्थानकांच्या नामांतराचा नुकताच धडाका लावल्याचे स्पष्ट झालेले आहेच, ते कमी की काय म्हणून, भारतातील सर्वात श्रीमंत देवस्थान अशी ओळख असणाऱ्या तिरुमला देवस्थान ट्रस्टच्या मंदिर उभारणीसाठी, अवघ्या नाममात्र भाडेतत्त्वावर, सुरुवातीला दहा एकर आणि नंतर पाच एकर जमीन बहाल करण्यात आली. परंतु, मंदिर उभारणीसोबतच सर्वसामान्य स्थानिक नागरिकांसाठी आणि ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेसाठी, अत्यावश्यक अशी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याचे औदार्य मात्र, महाराष्ट्र शासनाला दाखवता आलेले नाही. यासंदर्भात 'धर्मराज्य पक्षा'ने पाठविलेल्या पत्रांचा गांभीर्याने विचार करुन, नवी मुंबईतील उलवे नोड येथे, व्यंकटेश्वर मंदिर निर्मितीच्या माध्यमातून, वैद्यकीय महाविद्यालय तसेच, आरोग्य केंद्र उभारण्याबाबतचा निर्णय तात्काळ घेण्यात यावा, अशी विनंतीवजा आग्रही मागणी, महेशसिंग ठाकूर यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या सचिवांना, आपल्या पत्राच्या शेवटी केली आहे.

*उत्तरभारतीय लोंढ्यांची 'जनसत्ता' आणि गुजराथी–भाषिकांची 'धनसत्ता' या अडकित्त्यात सापडूनही जुगाराचे पत्ते, दारुचे गुत्ते, विविध धर्मसंप्रदाय–सार्वजनिक मंडळांनी महाराष्ट्रभरात लावलेले अध्यात्म–उत्सवप्रियतेचे सट्टे...या नशेत चूर मराठी–माणसाला, ते धड आकळत नाही. आपल्या जगण्यातलं सुखसमाधान–सन्मान, आर्थिकस्थैर्य आपण आपल्याच कर्मदरिद्री वृत्तीने हरवून बसलो आहोत; हे त्याच्या मेंदूत शिरत नाही. आकाशातले ग्रहतारे व नशिबाचे भोग यांना दोष देत, 'दैववादी' बनलेल्या तमाम मराठी–माणसांना नैराश्यातून–पराभूताच्या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी ''शहर–उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे फक्त एक दुकान, एक मकान'' कायदा... हे मराठी पिढ्यापिढ्यांसाठी अमोघ वरदान व विजिगिषु–वृत्तीच्या उन्मेषाचं आत्मभान ठरेल!*




*'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, आपल्या सहकाऱ्यांसह उपोषण स्थळाला भेट देऊन सायन (मुंबई) येथील धारावी–प्रकल्पग्रस्तांच्या, प्रस्तावित मुलुंड पूर्वेतील स्थलांतरास तीव्र विरोध करण्याच्या मुलुंड (पूर्व) येथील स्थानिकांच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला.*



# तुम्हाला खरंच देश वाचवायचा आहे का...???

## ...मग फक्त, एवढंच करा !

विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण आपला देश जवळ जवळ तुमच्या-माझ्या हातातून गेल्यासारखा आहे... आपल्याला शेवटची संधी २०२४च्या लोकसभा-निवडणुकीत मिळणार आहे. तुम्हाला खरंच आपला देश वाचवायचा असेल, तर एवढं करा..

- देश सैतानांच्या हातात गेला आहे, हे खरं असलं तरी, ‘सैतानाला पराभूत करणं अशक्य आहे’ या न्यूनगंडातून बाहेर या.
- ‘पर्याय कोण’ असले बालिश प्रश्न विचारू नका. विकृतीला समूळ नष्ट करायची असते. तिला पर्याय शोधायचा नसतो. आणि परिस्थितीनुरुप योग्य पर्याय आपोआप समोर येत असतो. चिंता करू नका.
- ही समस्या दोन/चार विकृत लोकांमुळे निर्माण झाली, असं नव्हे. अख्खा लांडग्यांचा कळप गावातून हाकलून द्यायचा आहे, हे लक्षात ठेवा. या बाबतीत स्वतःही कन्फ्युज होऊ नका. इतरांना करु देऊ नका.
- तुम्ही एकटे आहात, हे मनातून काढून टाका.
- ‘लोक समोर येत नाहीत, लोक घाबरतात, लोक ‘त्यांच्या’च बाजूला आहेत’ हे रडगाणं बंद करा.
- मी सामान्य माणूस आहे, मी काय करु शकतो? माझ्या हातात काय आहे ? हे पालुपद बंद करा. देशात लोकशाही आहे आणि एक व्यक्ती एक मत, ह्या सूत्रात प्रचंड मोठं सामर्थ्य आहे, याची जाणीव ठेवा. हे सर्वात आधी तुमच्या जवळच्या लोकांना पटवून द्या. घरच्या लोकांना पटवून द्या.
- तुम्ही त्रस्त आहात, तसेच शेकडो, हजारो, लाखो, करोडो लोकही परेशान, अस्वस्थ आहेत, याची खात्री बाळगा.
- ‘मी यांच्याशी लढणार आहे. मी या तडीपार, देशद्रोही गँगला, त्यांच्या पक्षाला कुठल्याही परिस्थितीत मतदान करणार नाही’ असा निर्धार करा. तशी शपथ घ्या. मित्रांना, नातेवाईकांना, समाजातील सर्व लोकांना हे ठासून सांगा. पुन्हा पुन्हा सांगत रहा. त्यांनाही तसे करायची विनंती करा.
- सैतानाच्या कळपात काही लोक स्वार्थापोटी तर काही भीतीपोटी सामील झालेले आहेत. काही लोकांना त्यांची घोडचूक लक्षात येत आहे. अशा लोकांशी जरा सबुरीने वागा. त्यांना हिडीस फिडीस करु नका. चुका प्रत्येकाच्याच




होत असतात. (मात्र, कितीही मोठे असले तरी तुम्ही त्यांच्या आहारी जाऊ नका...पुन्हा त्यांच्या नादी लागू नका...त्यांच्यापासून सतत सावध रहा) मात्र, जे अगदीच मूर्ख आहेत, ‘अंधभक्त’ आहेत, त्यांच्याशी ताबडतोब संबंध तोडा. उगाच वाईट वाटू नये, म्हणून गोड गोड बोलू नका किंवा वादही घालू नका. प्रश्न देशाच्या अस्तित्वाचा, सामाजिक समतेचा, बंधुभावाचा आहे, हे ध्यानात ठेवा. अशा अंधभक्तांना आपल्या ‘फ्रेंडलिस्ट’ मधून ताबडतोब कमी करा.
- जो देशाचा विचार करू शकत नाही, जो स्वार्थासाठी देशाशी ‘गद्दारी’ करतो, तो तुमचाही होऊ शकत नाही, हे लक्षात घ्या.
- हे करत असताना कोणत्याही विशिष्ट जाती समूहाला सरसकट टार्गेट करु नका. इतरांनाही तसे करु देऊ नका. स्वार्थी, बदमाष लोक सर्वत्रच आहेत, असतात. ते आपल्याही जातीसमूहात आहेत, याचे भान ठेवा. दोषी लोकांचा विरोध करा. सरसकट समूहाचा नव्हे.
- एखादी व्यक्ती आपल्या जातीची आहे, नात्यातली आहे, आपल्या भाषेची, प्रदेशाची आहे, एवढ्या कारणासाठी त्याचे गुन्हे, अपराध पाठीशी घालू नका. त्यातूनच नवे भस्मासुर पैदा होतात, याचे भान ठेवा. अशांचा स्पष्ट विरोध करा.
- दलाल मीडियावरील बातम्या पाहणे बंद करा. अशा चॅनेलवर बहिष्कार टाका. सोशल मीडियाचा वापर करा. त्यांच्या बातम्या बघा. योग्य बातम्या देणारे YouTube चॅनल कोणते आहेत, त्याची माहिती एकमेकांना द्या. असे बरेच चॅनल्स आहेत. त्यांना सबस्क्राईब करा. शक्य तेवढे आर्थिक सहकार्य करा आणि पाठिंबा द्या.
- घरात बसून किंवा फुकटात क्रांती होईल, ही मानसिकता आता सोडून द्या. देशासाठी, पुढील पिढ्यांसाठी त्याग करायला शिका, याचा गांभीर्याने विचार करा.
- चुका इतरांच्या होतात, तशा आपल्याही होऊ शकतात. आत्मचिंतन करा. झालेल्या चुका मोकळेपणाने मान्य करा. त्या दुरुस्त करुन पुढे जाण्याचा प्रयत्न करा.
- एक दिवस सर्वांनाच मरायचे आहे. पण इतिहास मात्र लढणाऱ्यांचीच अभिमानाने नोंद घेतो, याची जाणीव ठेवा. कुत्र्या-मांजरासारखी लाचारी पत्करुन रोज रोज मरण्यापेक्षा स्वाभिमानाने जगायला शिका.
- गुड मॉर्निंग, गुड नाईट, वाढदिवस, असले मेसेज पाठवण्यात स्वतःचा व इतरांचाही वेळ वाया दवडू नका.
- देश माणसांनी बनतो. माणसांची सेवा, त्यांचे हित म्हणजेच राष्ट्रहित, तिचं खरी ‘देशभक्ती’ आहे. नदी, नाले, पहाड, जंगल, गाय, बैल ही देशाची संपत्ती आहे.

*...ज्ञानेश वाकुडकर*

---

*‘‘भारताचा जसा जसा पडत जातो तसतशी भारताच्या पंतप्रधान पदाची ‘गरिमा’ (प्रतिष्ठा) पडत जाते’’*
*...इति, सुषमा स्वराज*

*२०१४ पासून भारताचा डॉलरच्या तुलनेत कसा पडत-झडत गेला, हे वरील प्रत्ययकारी फोटोमधून दाखवलंय.... ज्याने कोणी हे प्रारुप तयार केलं, त्याच्या बुद्धीला सलाम!*





‘‘देश सैतानांच्या हातात गेला आहे, हे खरं असलं तरी, ‘सैतानाला पराभूत करणं अशक्य आहे’ या मानसिकतेतून बाहेर या’’...हे ज्ञानेश वाकुडकरांचं खालील कळकळीचं आवाहन, सहजी आपण यासाठी मनावर घेतलं पाहिजे; कारण, जर ‘सैतान’ खरंच एवढा प्रभावी असता; तर कदाचित, आपण परमेश्वराची पूजा करण्याऐवजी सैतानाचीच पूजा केली असती... जगात सर्वशक्तिमान फक्त आणि फक्त परमेश्वरचं असू शकतो! पण, इथे एक गोष्ट मात्र ध्यानात घेणं जरुरीचं आहे की, हल्लीचा जो ‘आधुनिक व खास प्रशिक्षित असा सैतान’ आहे, हा ‘पुरातन सैताना’पेक्षा अतिशय बुद्धिमान, चलाख व व्यवस्थापन-तंत्रकौशल्यात पारंगत असल्यामुळेच; तो ‘व्यवस्थे’वर त्याची व्यवस्थित पूर्ण पकड बसेपर्यंत किंवा त्याची मगरमिठी अगदी घट्ट घट्ट होईपर्यंत... ज्या परमात्म्याचं न्यायनीतिपूर्ण व सत्यावर आधारित ‘ईश्वरी-साम्राज्य’ तो आधुनिक-सैतान, उध्वस्त करायला टपून बसलेला असतो; तो त्या शत्रूपक्षाचीच म्हणजेच, परमेश्वराची मंदिरं वगैरे बांधण्याची, देवधर्माचा उदो उदो करण्याची, अल्पकाळ नौटंकी व बेमालूम बतावणी, आपली दिशाभूल करण्यासाठीच केवळ, अत्यंत कौशल्याने व कुटिलनीतिने करत असतो, धन्यवाद! ***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ''कृपावंत आणि दयावान ईश्वराच्या नावाने, जो संपूर्ण विश्वाचा निर्मिक आहे...जो आदरास पात्र असून, त्याच्यावर माझे खूप प्रेम आहे!''

रमजान महिना सुरू आहे. याहीवर्षी कुराण वाचन सुरु आहे. यंदाची कुराण वाचण्याची ही आठवी वेळ. यंदाचे वाचत असलेले कुराण देखील सामान्यपणे कुठेही उपलब्ध होणारे नसून, हे बऱ्यापैकी लोकांना माहिती नसलेल्या पुण्यातील लेखकाचे आहे... ते लेखक म्हणजे डॉ. मुहम्मद अब्दूररहीम दळवी. लेखकाने हे कुराण १९९४ साली मराठीत भाषांतरीत केलेलं आहे. विशेष म्हणजे, या मराठी भाषांतरित कुराणची प्रिंट, ही पुण्यातील सदाशिव पेठेत तयार झालेली आहे. हे कुराण, पुण्यातील एका उर्दू शाळेतून मला भेट स्वरुपात मागील वर्षी मिळाले होते. तेच यावर्षी वाचून पूर्ण करत आहे.

**खरे पाहता, मी आता या सगळ्या गोष्टींच्या बराच पुढे निघून गेलो आहे. गेलो म्हणजे, माझे विचार बदलले आहेत. मी एकेकाळी कुराण पुढे काहीही नाही, असे मानणारा व्यक्ती होतो. ही भूमिका मी कुराण २ ते ३ वेळा वाचल्यावर झाली होती. मात्र, जसे जसे आणखीन चिकित्सा करत गेलो, तसं तसे मला 'इस्लाम मधील आणि कुराणा'मधील बऱ्याच गोष्टी, या कालबाह्य वाटत गेल्या. असे वाटण्यात खरेतर काहीही विशेष नाहीये. कारण, जगातील कुठलाही 'धर्मग्रंथ' हा परिपूर्ण नाही. तो परिपूर्ण असूही शकत नाही. कारण, कालानुरुप मानवी-व्यवस्था बदलत जात आहे. त्यामुळे कोणी कशाला कालबाह्य म्हणत असेल; तर, ते मनाला लावून घेण्याची गरज नाही. आणि कोणाला ते परिपूर्ण वाटत असेल; तर, त्याचाही आदरच आहे... शेवटी तो ज्याच्या त्याच्या धारणेचा भाग आहे.**

मला माझ्या धारणा कोणावर लादायच्या नाहीत आणि ईश्वरवाणी म्हणून कालबाह्य विचार, मला स्वतःवर लादूनही घ्यायचे नाहीत. धर्मात काही किंवा बऱ्याच अंशी असलेली नीतिमत्ता, ही चिरकाल टिकणारी आहे. त्याला कोणीही नाकारु शकत नाही. या सर्व गोष्टी मानवकेंद्रित आहेत. **जिथे अनीती आहे तिथेच नितीमत्तेचा उगम होतो. मानव हा**




**कायम अनीतीवर चालतो आणि त्यातून बाहेर येण्यासाठी काळाप्रमाणे नितीमत्तेवर आधारित नियम बनवतो. त्या नियमांचे पुस्तक बनवतो. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. मग त्यातील काही धर्मग्रंथ होतात, जे परिपूर्ण असल्याचा दावा करतात. तर, काही घटनादुरुस्ती करु शकणारे 'संविधान' होतात.** पण, हे सर्व काही मानव निर्मित आहे. मानवाने, मानवाचा विचार करून, मानवासाठी निर्माण केलेले हे सर्व ग्रंथ आहेत. या धर्मग्रंथात बदल व्हावा, अशी माझी कुठलीही इच्छा नाही. जगभरात असे ग्रंथ निर्माण करणाऱ्या सर्व सन्माननीय व्यक्तींचा, मी खूप आदर करतो. कारण, हे काम सोपे नसते.

**माझे बरेच विचार मुस्लिम समाजातील बहुतांश लोकांना आवडत नाहीत. मी त्यांचाही आदरच करतो. मी ज्या काळात त्यांना विचारांचे डोस देत आहे; तो काळ, आत्तापर्यंतच्या भारताच्या इतिहासातील खूपच कठीण काळ आहे. एकीकडे तुम्ही मॉब लिचिंग मध्ये मारले जाता, तुमची धार्मिकस्थळे पाडली जातात, तुमच्या नागरी अधिकारांचे हनन करण्याचा रोज प्रयत्न केला जातो आणि त्यात भरीस भर म्हणून पैगंबर शेख नावाचा व्यक्ती सुधारणावादी विचार मांडून 'कुराण आणि इस्लाम' मधील गोष्टींना कालबाह्य म्हणतो? या सर्व गोष्टी निश्चितच राग येण्यासारख्या आहेत. मात्र, तुमच्यावर ज्यावेळी अन्याय होतो; त्यावेळी, मी आवाज उठवतच असतो. मी कधीही याबाबतीत कमी पडलेलो नाही. मला मुस्लिमांमध्ये सुधारणावादी विचार मांडण्यासाठी, धर्मांध हिंदुत्ववाद्यांच्या मदतीची आवश्यकता नाही. ते विचार मांडताना मी मेलो तरीही स्वाभिमानाने मरेन. एका धर्मांधतेला विरोध करुन मी दुसऱ्या धर्मांधतेला गोंजारताना दिसणार नाही!**

असो, बरेच जण असे विचार मांडल्याने दुखावले आहेत. पुढेही दुखावले जातील, यात शंका नाही. याचा अर्थ, आपण खूप कमजोर आहोत, अशातलाही काही भाग नाही. मुस्लिम समाजात आपल्यासारखा विचार करणाऱ्यांची संख्या बरीच वाढली आहे. ते आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहेत... आणि, ती संख्या दिवसागणिक वाढत आहे. याहीवर्षी विचार आणखीन स्पष्टपणे मांडणार आहे. माझ्यासाठी हा विषय अजिबातच राजकीय नाही. मला याबाबतीत राजकारणाशी काहीही देणेघेणे नाही. हा विषय माझ्यासाठी पूर्णपणे आध्यात्मिक आहे... आणि, मी त्यावरच बोलणार आहे.

सर्वांना रमजान महिन्याच्या खूप साऱ्या शुभेच्छा. कुठेही रोजा ठेवलेले मुस्लिम उन्हातान्हात दिसले तर त्यांची मदत करा. जमल्यास आत्मीयतेने विचारपूस करा. वेगवेगळ्या आंदोलनात, मोर्चात सर्वांना पाणी देणारे मुस्लिम तुमच्या एवढ्या प्रेमाचे नक्कीच हक्कदार आहेत... समजलंतरठीक

– ***पैगंबर शेख*** (पुणे, महाराष्ट्र)
९९७००७०७०५

---

सोनम वांगचुक, ज्यांच्यावर 'थ्री इडियट' सिनेमामधील आमिर खानची 'रँचो' भूमिका साकारली गेलीय, आज त्यांनीच ''माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो आहे'' असं खर्याखुर्या रँचोसारखा गंभीर आरोप करत, लडाखमधील पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी व जम्मू-कश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर लडाखला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी प्राणांतिक उपोषण सुरु केलंय... एकूणच लडाखमधील नाजूक परिस्थिती व भारत सरकारचं त्याबाबतचं सततचं अक्षम्य दुर्लक्ष, सीमेवरील चीनच्या घातकी हालचाली व पंजाब-हरियाणा शेतकर्यांच्या आंदोलनामुळे; तसेच, लष्करातील 'अग्निपथावरील अग्निवीर' योजनेमुळे, लष्कराच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होऊन, जी भयंकर विस्फोटक व संवेदनशील स्थिती चीन-पाकिस्तानला लागून असलेल्या सरहद्दीवर निर्माण झालीय... त्याविषयी 'सोनम वांगचुक' पोटतिडकीनं जे बोलतायत, कृपया ते प्रत्येक 'जातिवंत देशभक्ता'नं (भाजपाई-संघीयांसारख्या बेगडी-बनावट देशप्रेमींनी नव्हे) ऐकावंच!

...***राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



अतिशय पारदर्शक पद्धतीने 'रेरा' एखाद्या स्वतंत्र-महामंडळातर्फे (ज्यावर, प्रामाणिकपणे कारकीर्द गाजवलेले प्रशासकीय अथवा पोलीस अधिकारीवर्ग नेमता येऊ शकेल, जेणेकरुन 'हितसंबंधी व अनैतिक राजकीय-हस्तक्षेप' टाळता येऊ शकेल...तरच, मराठी-तरुणाईला 'पक्षनिरपेक्ष' न्याय मिळू शकेल! सुदैवाने, १९७८-७९सालच्या ४४व्या घटनादुरुस्तीनुसार आता, 'संपत्तीचा अधिकार', हा घटनात्मक 'मूलभूत अधिकार' (Fundamental Right) राहिलेला नसून; तो आता केवळ, एक कायदेशीर हक्क Legal Right) बनलाय ! ''अतिरिक्त संपत्तीचं न्याय्य व यथार्थ पुनर्वाटप होऊन 'समतावादी-समाज' उभारणी करण्यातला एक मोठा घटनात्मक-अडसर, केव्हाचाच दूर झालाय''. आपल्या 'भारतीय-अध्यात्मा'त ''त्येन त्यक्तेन भुंजीथ:'', ही आदर्श-संकल्पना असून आपले राजे-महाराजदेखील प्रसंगोपात्त अतिरिक्त संपत्तीचे गोरगरीब जनतेला दान करायचेच.

साक्षात सर्वशक्तिमान सत्ता पायाशी लोळण घेत असतानासुद्धा पंतप्रधान इंदिरापुत्र संजय गांधी यांनी स्वतःचा विवाह सोहळा, २३ सप्टेंबर-१९७४ रोजी घरच्याघरी अगदी मोजक्याच मंडळींच्या उपस्थितीत कमालीच्या साधेपणाने पार पाडला होता.

या उलट, अंबानीपुत्राचा Pre Wedding चा सोहळा (विवाह सोहळा नव्हे) जामनगर येथे शेकडो कोटींचा चुराडा करून अति अलिशान पद्धतीत पार पडला. मग लग्नात तर पैशाचा पाऊसच पाडला, तर आश्चर्य वाटायला नको.



**एकीकडे मोदी ८० कोटी नागरिकांना दरमहा मोफत धान्य पुरवत आहेत तर, दुसरीकडे, मोदींचे गुजराती मित्र मुकेश अंबानी एका छोट्याशा घरगुती कार्यक्रमावर पाण्यासारखा पैसा खर्च करतात, हा मोठाच विरोधाभास!**

**पण तरीही, आपल्यापैकी बहुतांश नागरिकांना या भपकेबाज सोहळ्याचे कौतुक किती?**

**हा इतका पैसा अंबानींकडे आला कुठून? कुणाचा आहे हा पैसा?**

**जनता म्हणून कधीतरी हे प्रश्न पडतात का हो तुम्हाला?**

**उत्तर सोपं आहे... हा सर्व पैसा तुमचाच आहे. कसा?**

पुढे वाचा...

सरकारी कंपन्या (PSU's) जाणीवपूर्वक खड्ड्यात घालून, अंबानींचे उद्योग(?) भरभराटीस आणायचे. अर्थात, 'आपलेच वाटणारे' बहुतांश राजकीय नेते या पाप-कर्मात कोडगेपणाने सामिल आहेतच.

मुद्दा हा की, स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षांच्या प्रदीर्घ काळातील देशाच्या प्रगतीत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलं ते याच सरकारी उद्योगांनी, हे निर्विवाद!

**पं. नेहरूंवर तत्कालीन सोव्हिएत युनियनचा प्रभाव असूनदेखील त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेतेचा(Mixed Economy) स्वीकार केला आणि त्यातूनच हे अरबो रुपयांचे सार्वजनिक उद्योग (PSU's) निर्माण झालेत. ज्यात तुमच्या-माझ्या आधीच्या पिढीने अमाप कष्ट उपसलेत, घाम गाळला आहे...**

**हे वैभव एका रात्रीत आपल्याला प्राप्त झालेले नाही, याची जाणीव व्हावी म्हणून ही थोडी पार्श्वभूमी सांगितली.**

आज, वयाचा ६५-७०चा टप्पा ओलांडलेल्या आपल्या अगोदरच्या पिढीने याच PSU'sमध्ये नोकऱ्या करून आपल्या पिढीचे भरणपोषण केले. आपल्याला शिकवून मोठे केले, स्वतःच्या पायावर उभे केले, आपली लग्नेही लावून दिली.

थोडक्यात, आपल्या आर्थिक-सामाजिक विकासात या PSU's चे महत्त्व अनन्यसाधारणच आहे.

आजही, माझ्या वडीलांचे मित्र कधी भेटले तर त्यांच्या जुन्या आठवणी सांगतात. उदा. त्यांच्याच शब्दात सांगतो-

''अरे, मी मॅट्रिक (त्यावेळचे अकरावी) झालो आणि सचिवालयातून कॉल आला.''

''सातवी (त्यावेळचे Vernacular) पास झालो अन् BMC त चिकटलो''

**''बारावीनंतर (तत्कालीन Inter) मला अमुक बँकेत क्लार्कची नोकरी मिळाली, निवृत्त होताना GM झालो''**

**आजूबाजूला पाहिले तर, अशी कैक उदाहरणे तुम्हाला सहज पहायला मिळतात. या जुन्या लोकांचे अनुभवही नीट ऐका, माहित करुन घ्या, म्हणजे आपण कुठे होतो आणि आज कुठे आलो, हे नेमकेपणाने तुमचे तुम्हालाच समजून येईल.**

**ही सविस्तर उदाहरणे लक्षात घेतल्यास, कल्याणकारी राज्याची (Welfare State) संकल्पनेची व्याख्या सांगायची गरजच मला वाटत नाही.**

**आज, बहुतांश अस्थापनं खासगीकरणाच्या विळख्यात सापडलीत. तिथं २०-२५ वर्षांची पोरं १२-१५ हजारांत बारा-बारा तास नोकरी (नव्हे, गुलामी) करतात.**

पूर्वी गिरणी कामगारसुद्धा ८ तासाची पाळी पूर्ण करून घरी येई. शिवाय, समाजात त्याला मानाचे स्थान असल्याने स्वाभिमानाने जगत असे.

हा स्वाभिमानी कामगारवर्ग जाणीवपूर्वक नष्ट करून जागतिकीकरणानंतर आजचा हा गुलामी करणारा नवा वर्ग निर्माण करण्यात येत आहे. हेच ते शोषणाचं नवं मॉडेल! आणि ते उभे करण्यात सर्वपक्षीय नेतृत्व अंबानी-अदानी सारख्यांना केवळ मदत करत नाही तर, सहभागी होत आहेत.

सर्वसामान्य जनतेविरुद्ध चाललेले हे षडयंत्र रचताना आपल्याला (मतदारांना) गृहीत धरून राजकीय नेतृत्व परस्पर निर्णय घेत आहे आणि आजच्या बहुतांश Main Stream मिडीयाचाही यात मोठा सहभाग आहे. म्हणूनच, अंबानींची डोळे दिपवून टाकणारी श्रीमंती सतत टीव्हीवर दाखवून, आपल्याला बधिर/संमोहित केले जाते.

**वास्तविक,अंबानीच्या कार्यक्रमात वाढले जाणारे जेवण बहुतांश नागरिकांना रोजच मिळायला हवे. स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत एका सामान्य नागरिकाने किमान इतकी तरी अपेक्षा बाळगली तर चुकीचे ठरेल काय?**


**परंतु, ते टीव्हीवर बघूनच समाधान मानण्याची वेळ आपल्यावर आलीय, यातच सर्व आले.**

आपण, जनतेनेच सरकारी पाठबळावर उभारलेले अब्जावधींचे अनेक PSU's अक्षरशः कवडीमोल किमतीत विकत घेऊन अंबानींनी गडगंज पैसा कमावला आहे आणि आज त्याच पैशाचं ओंगळवाणं प्रदर्शन आपल्यासमोर सादर करत आहेत. देश म्हणून आपण पुरते फेल झाल्याचंच ते व्यवच्छेदक लक्षण आहे आणि तरीही सर्व पक्षीय नेते आपल्यासमोर भारतमातेचे गुणगान गात आहेत, वास्तवाला पद्धतीशीर फाटा देऊन!

माझ्या मते, हीच आपली सर्वात मोठी फसवणूक आहे.

खरं तर, तो सारा अगणित पैसा तुमचा-माझाच आहे, हे आपण कधी ओळखणार?

**...रुद्रेश सातपुते, ९८६९४५५८२५**



कुठे ते, ''तुम मुझे खून दो, मै तुम्हें आजादी दूँगा'' म्हणणारे कडवे-देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस आणि कुठे, ''तुम मुझे 'चंदा' दे दो...मै तुम्हे 'धंदा' दूँगा'' म्हणणारे बडवे-देशद्रोही 'गुजराथी-लॉबी'वाले... ज्यांच्यासाठी, ''देश चालवणं म्हणजे केवळ, आपल्या खास गुजराथी-भाषिक भांडवलदार मित्रांसाठी मांडलेला-थाटलेला, एक अतिशय किफायतशीर धंदाच होय!

**...अशी क्षुद्रवृत्ती धारण करणाऱ्या शासनकर्त्यांच्या हिणकस, समाजघातकी व्यापारी-वृत्तीकडे पाहूनच, 'खलील जिब्रान' म्हणाला होता, ''जिस देश का राजा 'बेपारी', उस देश की प्रजा 'भिखारी'...!!!''**

...म्हणूनच, जगभरात आपल्याच देशात सर्वात वेगाने अतिश्रीमंतांची (ज्यांची संपत्ती १०००कोटींहून अधिक आहे) संख्या वेगाने वाढतेय...गेल्या वर्षभरात असे २७८ अतिश्रीमंत वाढले; तर, गेल्या पाच वर्षांत त्यांची संख्या ७६% नी वाढली) आणि अशा १०००कोटींहून अधिक संपत्ती असणाऱ्या धनाढ्यांची देशात आजमितीस एकूण संख्या १३१९ एवढी बनल्याने, एवढी मोठी संख्या असणाऱ्या, हाताच्या बोटावर मोजता येतील, एवढ्या मोजक्या देशांपैकी जगभरात भारत एक देश बनलाय! दुसऱ्या बाजुला शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि आंदोलनं सुरुच आहेत व ''१२ तासाच्या कामाला १२ हजार दरमहा पगार'', अशा अवनत स्थितीत आजच्या भांडवली-व्यवस्थेत...'गुलाम-नवअस्पृश्य' असा, 'कंत्राटी-कामगार' म्हणून कामगार राब राब राबतोय...बेरोजगार तरुणवर्ग टाचा घासतोय मध्यमवर्ग महागाईने पोळून निघतोय; तरीही, कधि राममंदिराच्या घंटानादात, तर कधि ज्ञानव्यापी मस्जिदीच्या भोंग्यात...सामान्य माणूस अजूनही अडकलेलाच! या दुर्भाग्याला, भयंकर दुर्दैवाला... म्हणावं तरी काय...???

**...राजन राजे**

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# भारत नावाच्या देशाचं टाईम ट्रॅव्हल!

टाईम मशीनचं कोडं अजूनही अनुत्तरीतच आहे, ते सामान्य जनांसाठी. फार पूर्वी म्हणजे हडप्पाकालीन संस्कृतीत भविष्याचा वेध घेऊन २०१४ साली याच मातीत काही दैवी शक्ती पुन्हा अवतरीत होतील आणि भविष्याच्या दृष्टीने वाटचाल करत वेगवान धावणाऱ्या लोकांना, त्यांचा नॉस्टॅल्जिया परत मिळवून देणारा महान दैवी अवतारी पुरुष केंद्रस्थानी येईल, अशी भविष्यवाणी करुन ठेवली होती. त्याचे लिखित पुरावे ऑर्कूटवर होतेच. फेसबुकवरही आढळतीलच जर नीट शोधले तर...

**भारत नावाच्या देशाने मंडल की कमंडलच्या भांडणात कमंडल निवडलं आणि प्रवास सुरु केला भूतकाळातल्या प्रवासाचा. १९९२ ते २००२... 'अयोध्या ते गोधरा' हा प्रवास दोन पिढ्यांना पुन्हा २० वर्षे मागे टाकणारा ठरला होता. २००४ ते २०१४ या कालखंडात सर्व काही उपभोगून सुस्तावलेल्या बेईमान मध्यमवर्गाने पुन्हा एकदा उलटा प्रवास करायचा निर्णय घेतला आहे.**

आज २०२४ उजाडताना आपण पुन्हा आणीबाणीचे दिवस अनुभवत आहोत. सरकारचे प्रमुख तुरूंगात आहेत. एक स्कूल ड्रॉपआऊट आयआयटीयन्सना, हॉवर्डवाल्यांना वेड्यात काढतोय, तुरुंगात टाकतोय. ही तर सर्व त्या अंधकार युगाचीच नांदी आपण अनुभवतोय. घरं तोडली जात आहेत. लोक तुरूंगात टाकले जात आहेत, ऑन कॅमेरा इलेक्शन भ्रष्ट केले जातेय. सुप्रीम कोर्ट रद्दबातल होतेय. पक्ष फोडणे, भ्रष्टाचार करणे, अदानी-अंबानीसारखे विनामेहनतीचा पैसा ओरबाडणे याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. हेच तर सर्व हिंदुस्थानातल्या अंधकारयुगात होतं. जिथं धार्मिक संस्थाने श्रेष्ठ आणि विद्यापीठे तुच्छ मानली जात होती.

हा टाईम ट्रॅव्हल, मोदीजींच्या दूरदृष्टीमुळे आपल्याला शक्य झाला आहे....यासाठी, त्यांना २०२४ सालचा नोबेल जाहीर झालाच पाहीजे. हे सर्व काही आधीच पुराणात लिहून ठेवलेले होते. हा नॉस्टॅल्जिया याआधी कधी ऑगजम मिळवून देत होता का? नव्हता ना?? हे श्रेय फक्त सुप्रीम लीडरचेच!

**आज भारत बेरोजगारीत अव्वल आहे. प्रदूषणात जगात अव्वल आहे. एकही मित्र राष्ट्र नाही. जगभरात छी: थू: आहे. नवे उद्योग म्हणजे निव्वळ फेकाफेकच सिद्ध झालंय. इलेक्टोरल बाँड तर, चार आण्याचीच गोळी आहे. खरं सिल्कवालं २५०चं डेरी मिल्क तर पीएम केअर फंड आहे. तोही उघडकीस येईलच याच आचारसंहितेच्या दिवसांत...**

**हे चालू राहीलच पण मला काळजी त्या दोन घटकांची अधिक वाटते ...**

**१. जे तरुण तरुणी अंधपणे या गोष्टींचे, हुकूमशाहीचे समर्थन करत आहेत...**

**२. जे तरुण-तरुणी या सर्वांकडे दुर्लक्ष करुन आहेत....**

**या दोन्ही घटकांचे तर, कुत्रंही हाल खाणार नाही... कारण, शिक्षण हे आता दुय्यम ठरवलंय, या लोकांनी. सगळेच आज एक तर दलालीत उतरलेत, सेटिंगमध्ये जुंपलेत नाहीत किंवा टक्केवारीत अडकलेत. उद्या ही दडपशाहीची मगरमिठी जेव्हा आणखी घट्ट आवळेल; तेव्हा कसे निभावून घेतील, कुणास ठाऊक...**

मी जेव्हा स्वतःच्या बाबतीत विचार करतो, तेव्हा मला माझी फार फिकीर वाटत नाही. मी कधीही कोणत्याही क्षणापासून, कोणत्याही पॉईंटपासून शून्यापासून सुरूवात करू शकतो. माझ्याकडे शिक्षण आहे. आज इथे नाही; तर दुसऱ्या देशातही मी कधीही काम मिळवू शकतो. माझ्याकडे काही 'स्किलससेट' आहेत. ज्यात मी पारंगत आहे. त्या बळावरच पत्रकारीतेत करियर न करताही, माझं व्यवस्थित चालवू शकतो मी, हा आत्मविश्वास आहे मला. लाथ मारु तिथून पाणी काढू...हा खाक्या आहे.

पण त्यांचं काय... ज्यांचं आयुष्यच १ तारखेच्या पगाराभोवती गुंतलंय. ही दडपशाही, नवी गुलामगिरी त्यांना सुखाने जगू देणे तर सोडाच, पण साधा श्वास तरी घेऊ देईल का?

आपण आपलं आपलं ठरवण्याची वेळ आली आहे. स्वतःचा विचार करा. भविष्याचा विचार करा. वेशीबाहेरचे जग नव्याने बांधलं जातंय. तिथे 'ते' वगळले की, बाकी सर्वच शुद्र.

**संविधान आहे, तोपर्यंत नागरिक म्हणून दर्जा आहे. नंतर मनुस्मृतीनुसार तुच्छ गुलामच... हा टाईम ट्रॅव्हलचा प्रकार थांबवणं न थांबवणं, हा ज्याच्या त्याच्या चॉईसचा मुद्दा बनलाय.**

शेवटी काय आहे.. आपण आपल्याच कर्माने मरत असतो.

#Vaibhav_Chaya

*(संक्षिप्त रुपात...समाजमाध्यमातून साभार)*




सावंतवाडीतील सांगेली गावच्या जायपेवाडीत रहाणारा 'कोकणी-रानमाणूस' म्हणजेच, सर्वांचा लाडका 'प्रसाद गावडे'... 'कोकण ते लडाख', असं आपलं बोट धरुन फिरवत, देशातल्या निसर्ग-पर्यावरणीय समस्यांविषयी जे थोडक्यात प्रतिपादन करु पहातोय ते ऐकणं, हे आपल्या नातवंडांच्या आणि त्यांच्याही पुढील पिढ्यापिढ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचं...


भाजपाई-संघीय 'गुजराथी-लॉबी', ही भारतातील निसर्ग-पर्यावरणावरच फार मोठं संकट आहे...गुजराथच्या पातकी-भूमितून आलेल्या भांडवलदारवर्गाने आपल्या सैतानी हव्यासापोटी देशभरातला निसर्ग वेठीला धरुन पर्यावरण उध्वस्त करायला घेतलंय. पाशवी लालसेनं, राक्षसी तृष्णेनं भरलेल्या याच मातीत...अपवाद म्हणून जन्मलेला, आपला राष्ट्रपिता, महात्मा म्हणून गेला होता की, ''सगळ्यांच्या मूलभूत गरजा भागवायला आपली पृथ्वीमाता सक्षम आहे...पण, एखाद्या व्यक्तीची तृष्णा, लालसा भागवायला मात्र नव्हे'', ते किती जाज्वल्य-ज्वलंत सत्य होतं, ते आज उद्भवलेल्या पर्यावरणीय महासंकटांमुळे उशिरा का होईना; पण, आपल्याला आत्ता कुठे हळूहळू समजू लागलंय!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...The First "Green-Political Party' Of India)

*ज्याप्रमाणे, यहुद्यांनी (ज्यू-लॉबी) दुसऱ्या महायुद्धापूर्वी जर्मनीत व दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेत...प्रथम, अर्थव्यवस्थेत व पुढे राजकीय-व्यवस्थेत (आर्थिक-वर्चस्वाच्या सूतावरुन राजकीय-वर्चस्वाचा स्वर्ग) आपलं संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित केलं...तो आणि तसाच प्रयोग, गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाकडून प्रथम महाराष्ट्रात व आता, उर्वरित भारतात (उदा. राममंदिराच्या निमित्ताने जिथे त्यांना उद्योग-व्यापारात 'पायरव' मुश्किल होता, त्या उत्तर प्रदेशातही ते मुसंडी मारण्यात यशस्वी झालेत...राममंदिराच्या अनेक राजकीय-उद्दिष्टांसोबतच, 'गुजराथी-लॉबी'चं हे एक प्रमुख उद्दिष्ट होतं) यशस्विरित्या पार पाडला गेला वा जातोय. या साधर्म्यासोबतच, दोन जमातीत मोठा फरकही आहे, तो आपल्यासाठी महत्त्वाचा...!!!*

# जगण्याचा क्रूर खेळ मांडणारी, 'भांडवली-मांडवली' व्यवस्था!

...पृष्ठ क्र. १ वरुन



धर्मराज्य पक्ष
(Reg.No. 56/122/2011/PPS-I)
अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.: DRP/RG/MP/INC/2024/16 दिनांक: 16/03/2024

To,
Mr. Rahulji Gandhi,
MP-Indian National Congress,
12, Tughlak Lane,
New Delhi – 110011.

Dear Rahulji,

About myself and my Political Party….
I am a Labour union leader for over four decades in maharashtra, dealing with thousands of workers, who has staged 'DharmaYuddha' against 'Contract Labour System', so far.
My political initiative 'DharmaRajya Paksha'...may not be a great story of Political-Success; but surely is a story of 'Moral Values & Ethics', which nobody in Maharashtra can deny and ignore...Our motto is "Zero Tolerance Towards Corruption and Exploitation Of Man & Nature"!

All through these turbulent times of Modi Government, we have been wholeheartedly supporting all of your political endeavours.
Our political perspective about you, as a national political figure....
We deeply adore your heroic efforts, considering the kind of horrific circumstances, you have been made to suffer...The whole of our nation looks upon you, as their leader to free them from the evil clutches of extreme right-wing divisive, immoral and hate fueling politics of BJP & RSS (rightfully termed as 'hatemongers' by you)!


Why we wanted to meet you in person, in our Thane city....
Now, the very reason why we wanted to meet you, is to make you aware of the plight of the workers, especially in maharashtra.
Plight of the workers....
More than the unemployment, 'under-employment' is a present day ominous phenomenon.
Workers rights, these days, are totally denied and workers' fight for their rights is over and completely obliterated under Modi Government....
Workers are faced with and subjugated to the "Corporate-Terrorism" in almost every workplace, mainly due to "Contract Labour System" prevalent in the whole of the country, which is nothing short of "Neo-Slavery & Neo-Untouchability"

The resultant "Labour Arbitrage" is forcing thousands of workers to commit suicides. Though unfortunately such workers' suicides do not have the 'branding' like that of the farmers...they are of more serious type and most pitiable, as they don't happen alone, but such workers' suicides

*Page 1 of 2*

रजि. कार्यालय : 'पांचजन्य', ७/६०१-६०२, फेज-१, शुभारंभ, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. dharmarajyapaksha@gmail.com www.dharmarajya.org
कार्यालयीन संपर्क : तळमजला, रविदर्शन बिल्डींग, बेडेकर हॉस्पिटल शेजारी, द्वारा-राममारुती रस्ता, डी.एन.एस. बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.)-४०० ६०२. भ्रमणध्वनी क्र.: ७७७७० ६९५३०

*"सर्वसामान्यांचं जीवन आणि पर्यावरण, हवं एवढ्यासाठीच राजकारण!" ...*



धर्मराज्य पक्ष
(Reg.No. 56/122/2011/PPS-I)
अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.: DRP/RG/MP/INC/2024/16 दिनांक: 16/03/2024

often involve and are accompanied by suicides of their family members too...that's utterly shocking!

Why workers' suicides despite being more in numbers than the farmers, are still being neglected...???
In urban area the density of the population is highest and their economic condition alarming. What city-dwellers can get free, is only air and that too, highly polluted. When faced with an economic condition, where there is no way out...leads to higher suicide rate among the underprivileged urban working-class.
But, since the entire 'Vampire-State System' unleashed by BJP/RSS in our country, is thriving on the horrible exploitation of the urban working-class, the so called 'Godi-Media' or others tend not to take cognisance of that.

Rahulji, we request you to be aware of the fact that the workers unitedly cannot fight and stage any prolonged agitation like our farmers...simply because, these dispensible workers, can be easily removed from the jobs, for ever, just because they have entered into any anti-system agitation...unlike the farmers, who can't be displaced from their farm-lands,

Hence, herewith, we request you to include in your I.N.D.I.A. front's manifesto and announce, "Repealing of the Black 'Labour-Code' forced upon the entire workforce by Modi Government, if I.N.D.I.A. front is voted to power!"
Electoral importance & implications of the same for the LokSabha Election-2024....
Such assurance and announcement of "Repealing of the 'Black Labour-Code'...shall send out a very strong message across the ranks & files of the entire working-class and bolster their confidence in you, personally and in Congress! Crores of workers, employees will welcome and hail this move of yours, for sure...and, shall provide a decisive winning edge to I.N.D.I.A. (Indian National Developmental Inclusive Alliance) front, without fail.
Thank you,

Yours Truly,

**Rajan Raje**
President : Dharmarajya Paksha
(Mobile No. 9821064898)

*Page 2 of 2*

रजि. कार्यालय : 'पांचजन्य', ७/६०१-६०२, फेज-१, शुभारंभ, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. dharmarajyapaksha@gmail.com www.dharmarajya.org
कार्यालयीन संपर्क : तळमजला, रविदर्शन बिल्डींग, बेडेकर हॉस्पिटल शेजारी, द्वारा-राममारुती रस्ता, डी.एन.एस. बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.)-४०० ६०२. भ्रमणध्वनी क्र.: ७७७७० ६९५३०

*"सर्वसामान्यांचं जीवन आणि पर्यावरण, हवं एवढ्यासाठीच राजकारण!" ...*

**कामगार-पुढाऱ्यालाच जर नजिकच्या भविष्यातला भारताच्या 'पंतप्रधानपदा'चा प्रबळ दावेदार असलेल्या राहुल गांधींसारख्या राष्ट्रीय-नेत्याची ओझरती देखील भेट मिळू शकत नसेल; तर, त्याचा सरळ अर्थ हा की, या देशातल्या कामगाराला, रस्त्यावरचं कुणी 'काळं कुत्रं'देखील विचारायला आज तयार नाही!** ...कारण अगदी उघड आहे, कामगार स्वतःहून कधि उत्तम दर्जाचा, समर्पितवृत्तीचा राजकीय-कार्यकर्ता तर नसतोच (जसे, शेतकरी असतात किंवा तळागाळातला अन्य वर्ग असतो); पण ओठातल्या घासासाठी, कुटुंबाच्या पोटासाठी तसेच, आपल्या सन्मान-सुरक्षेसाठी म्हणून देखील 'मतदान' करताना, निखळ 'कामगारधर्म' पाळणारा 'मतदार'ही सहसा तो नसतो...हे आजच्या राजकीय-व्यवस्थेनं अचूक ओळखलेलं आहे (ज्याला, आम्ही 'Vampire-State System' किंवा 'रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्था' म्हणतो) आणि म्हणूनच, उंदाराला मांजराने खेळवावे, तसे ती 'भांडवली-मांडवली व्यवस्था', बिनदिक्कत कामगार-कर्मचारीवर्गाच्या जगण्याचा क्रूर खेळ मांडत असते, असो!

**...लक्षात घ्या की, जेव्हा जेव्हा, व्यवस्थेकरवी हेतूतः अपमान किंवा हेतूतः दुर्लक्ष होत असतं...तेव्हा, तेव्हा तो अपमान किंवा ते दुर्लक्ष, केवळ, राजन राजेसारख्या 'कामगार नेत्या'चंच नसतं... तर, समस्त कामगार-कर्मचारीवर्गाचं असतं. 'भाजपा', हा राजकीय पक्ष म्हणून, सरळ सरळ गुजराथी-भाषिक तथा सिंधी, पंजाबी भांडवलदारवर्गाचं निर्घृण-हिणकस प्रतिनिधित्व करत असतो! त्या मुठभर भांडवलदारांचेच 'आर्थिक हितसंबंध' जपण्यासाठी मोदी-शहा या 'गुजराथी-द्वयी'ला (गुजराथी-लॉबी) हाताशी धरुन, कुठल्याही थराला जाणारा भाजपा व त्यांची मातृसंस्था म्हणजे RSS (ज्यांनी, ४ काळ्या कामगार-कायद्यांच्या 'काळी कामगार-संहिते'ची गुलामगिरी देशातल्या कामगार-कर्मचारीवर्गावर लादलीय)...हे दोन्ही, देशातल्या कामगार-कर्मचारीवर्गाचा शत्रू क्रमांक एक आहेत...आणि, 'भाजपा' राजकीय पक्ष म्हणून मतपेटीतून कामगार-कर्मचारीवर्गाने संपवला नाही; तर, कामगार म्हणून तुमचं अस्तित्व संपेल व अस्तित्व उरेल ते फक्त, एक 'आधुनिक गुलाम' म्हणून!**

मित्रहो, वाचकांची तशी खरोखरीच मागणी आल्यास, राहुल गांधींना सादर केलेल्या मूळ इंग्रजी निवेदनाचा मुक्त-प्रवाही मराठी अनुवाद, जरुर सादर केला जाईल... कामगारांची 'यथायोग्य-सनदशीर इच्छा', हा 'धर्मराज्य'साठी 'आदेश'च असतो... म्हणूनच, आपली इच्छा असलेल्यास निवेदनाचा मराठी-अनुवाद, त्याअर्थाने 'कामगार' म्हणून तुमचा हक्कच बनेल...धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## माय नेम इज बॉण्ड...इलेक्टोरल बॉण्ड ०५६...!!!

सत्तेवर येताच दाऊद इब्राहिमला पाकिस्तानातून खेचून आणण्याची भंपक भाषा करणारा 'भाजपा'...स्वतःच 'दाऊद इब्राहिम'चा बाप बनलाय आणि त्या विपरीत अर्थाने, खरोखरीच भाजपाने दाऊद इब्राहिमला भारतात आणून आपला शब्द पाळला (भले मग, स्विसबँकेतला काळा पैसा आणायचं आणि त्यातून प्रत्येक भारतीयाच्या जनधन खात्यात १५ लाख रु. टाकायचं, राहून का जाईना); त्याबद्दल, भारतीय जनतेनं भाजपाच्या दिल्लीश्वर धेंडांचं अभिनंदनच करायला नको का? ...शिवाय, गेली १० वर्षे दिवसाढवळ्या आपल्या बड्या गुजराथी-भांडवलदार दोस्तांना 'देश लुटून आणि देश विकून', वर आम्हीच देशभक्त (मा. उद्धवजी ठाकरेंच्या अर्थवाही शब्दात बोलायचं; तर, 'द्वेषभक्त') म्हणून मिरवणारे व तशी शिमग्याची बेमालूम सोंगढोंगं वठवणारे 'भाजपाई-संघीय' लोकं...तेव्हाच उघडे पडले; जेव्हा, पाकिस्तानी HubPower कंपनीकडून इलेक्टोरल-बॉण्ड'द्वारे 'चंदा' वसुली केल्याचं जगजाहीर झाले आणि त्या धक्कादायक घटनेतून त्यांच्या बनावट 'देशभक्ती'चा मुखवटा अगदी अलगद गळून पडला (सुब्रमण्यम स्वामी, ज्याचा सतत नामोल्लेख करत असतात...ते मोदी-शाह सरकारचं 'चिनी कनेक्शन', लवकरच उघडं पडावं)!




...तेव्हा, वाचकहो, राहुल गांधींनी ज्या 'वसुली भाई'चा जबरदस्त उल्लेख केला... त्याची 'भाईगिरी' व त्याच्या 'वसुली रॅकेट'चा भांडाफोड, ध्रुव राठीच्या वरील व्हिडीओतून आवर्जून पहा!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# फ्युचर गेमिंग अँण्ड हॉटेल सर्विसेस आणि इलेक्टोरल बॉण्डस खरेदी...




फ्युचर गेमिंग अँण्ड हॉटेल सर्विसेस या कंपनीने १३६५ कोटी रुपयांचे इलेक्टोरल बॉण्डस खरेदी केले. ३१ मार्च-२०२२ पर्यंत या कंपनीला तिच्या दैनंदिन व्यवहारातून मिळालेलं उत्पन्न (ऑपरेटिंग रेव्हेन्यू) ५०० कोटी रुपये होतं.

या कंपनीची वार्षिक उलाढाल २० हजार कोटी रुपये आहे. म्हणजे वार्षिक उत्पन्नाच्या जवळपास अडीच पट रक्कमेचे इलेक्टोरल बॉण्डस या कंपनीने खरेदी केले. इथे सरळ सरळ गडबड-घोटाळा आहे. ही रक्कम या कंपनीची नसावी.

**इलेक्टोरल बॉण्डसची प्रक्रिया काय आहे...**

१. एक व्यक्ती पाच कोटी रुपयांचे इलेक्टोरल बॉण्डस स्टेट बँक ऑफ इंडियाकडून खरेदी करते.
२. सदर व्यक्ती तिच्या पसंतीच्या राजकीय पक्षाला ते बॉण्ड भेट देते.
३. सदर राजकीय पक्ष ते बॉण्ड स्टेट बँकेत वटवतो. म्हणजे पाच कोटी रुपये सदर राजकीय पक्षाच्या बँक खात्यात जमा होतात.

या प्रक्रियेत कोणत्या व्यक्तीने कोणत्या पक्षाला किती रक्कम दिली ह्याची माहिती केवळ स्टेट बँक आणि केंद्र सरकारकडे असते. सामान्य लोकांना ती माहिती मिळत नाही.


सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार स्टेट बँकेने कोणत्या कंपनीने कोणत्या तारखेला किती मूल्यांचे किती बॉण्डस खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती पैसे मिळाले ही माहिती निवडणूक आयोगाकडे सोपवली आहे. मात्र कोणत्या कंपन्यांनी कोणत्या राजकीय पक्षाला देणगी दिली ही माहिती गुलदस्त्यात आहे. त्यासाठी पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे खटखटावे लागतील. कारण तरच नागरिकांचा, मतदारांचा माहितीचा अधिकार शाबीत होतो. असो.

१. कायदेशीर मार्गाने सर्व कर वगैरे भरून मला २५ कोटी रुपये नफा झाला आहे. या नफ्यावर अर्थातच आयकर द्यावा लागणार.
२. माझ्या मित्राकडे पाच कोटी रुपये कर चुकवेगिरी करून मिळवलेले आहेत.
३. तो मित्र माझ्याकडे येतो आणि मला पाच कोटी रुपये रोख देतो.
४. मी स्टेट बँकेत जाऊन पाच कोटी रुपयांचे बॉण्ड्स खरेदी करतो आणि त्या मित्राकडे देतो.
५. हे बॉण्डस माझा मित्र त्याच्या पसंतीच्या पक्षाला देणगी म्हणून देतो.
६. पाच कोटी रुपयांच्या बॉण्डसची खरेदी मी कायदेशीरपणे केली आहे. पाच कोटी रुपयांवर मला आयकर द्यावा लागत नाही.
७. माझा मित्र त्याच्या पसंतीच्या राजकीय पक्षाला पाच कोटी रुपये देणगी देऊन त्याच्या करचुकवेगिरीला राजरोस संरक्षण मिळवतो.

इलेक्टोरल बॉण्डस या फिनान्शिअल इन्स्ट्रुमेंटमुळे काळा पैसा पांढरा करण्याची दारं सताड उघडली गेली. नरेंद्र मोदी सरकारने भ्रष्टाचाराला कायदेशीर संरक्षण देण्याचं काम केलं. फ्युचर गेमिंग अँण्ड हॉटेल सर्विसेसच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होतं.

भाजपला मिळालेलं उत्पन्न पाहाता, भारताच्या इतिहासात सर्वाधिक भ्रष्टाचार करण्याचा विक्रम नरेंद्र मोदी सरकारने केला आहे.

***...सुनील तांबे*** (Sunil Tambe)




*भारतानं ३६ राफेलचा ९ बिलियन डॉलर्समध्ये करार केला; तर, कॅनडाने ८८ राफेलचा १४ बिलियन डॉलरमध्ये केला...विश्वगुरु, तेव्हा 'इलेक्टोरल-बॉण्ड'चं गणित गुपचूप, लपूनछपून बसवत होता...मग, देशाचं नुकसान किती झालं आणि काय झालं, कुठे फरक पडतो...???*






*मुंबई विमानतळाला व बीकेसीला खेटून असलेल्या जवळपास ६०० एकरावर पसरलेल्या धारावी-झोपडपट्टीच्या अतिशय मोक्याच्या जागेच्या पुनर्वसनात...गौतम अदानीच्या कंपनीला दिले गेलेलं अत्यंत वादग्रस्त कंत्राट आणि त्यांना मोदी-शहांच्या भाजपा केंद्र-सरकारतर्फे व ट्रिपल-इंजिनवाल्या महाराष्ट्र-सरकारतर्फे, ज्या बेफाम-बेकायदेशीर सवलती दिल्या गेल्यात...त्याविरोधात, संपूर्ण धारावी-परिसर अदानीविरोधात रस्त्यावर उतरलेला आहे. दि. १ मार्च (शुक्रवार)-२०२४ रोजीच्या धारावीतल्या या ' 'अदानी हटाव, धारावी-बचाव'' आंदोलनात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनावर एकच हल्लाबोल केला.*

# ‘पुनर्वाचना’साठी... आपल्या ‘लायकीचे’ सरकार ‘आपल्याला’ मिळते! – संजय पवार


**...ज्यांची मुळंच प्रश्न विचारायचे नाहीत, अशा भूमीत रुजलेली, त्यांच्याकडून राजकीय शहाणपण, प्रगल्भपणा आणि संयम यांची अपेक्षा करणं, तसं चुकीचंच...हे पुन्हा एकदा दिसून आलं. शंभरावर माणसं केवळ रांगेत उभी राहून मेली, त्या नोटबंदीचं समर्थन करणारेच काल पुन्हा ढोल बडवत होते! याला ‘संमोहन’ म्हणणं फारच चुकीचं ठरेल. कालचा जल्लोष, समाजमाध्यमावरची उन्मादी भाषा, विकृत संदेश पेरणी, हे सर्व मूर्ख, बिनडोकपणाचं....**

भारतीय जनता पक्ष हा राजकीय पक्ष इतका उथळ बनेल आणि देशालाही उथळपणावरच आणून ठेवेल असं वाटलं नव्हतं. प्रत्येक राजकीय पक्षाची एक विचारधारा असते, तशीच कार्यशैली आणि कार्यसंस्कृतीही असते.

**भारतीय जनता पक्षानं गंभीर राजकीय निर्णयाचंही ‘दहीकाला’ पद्धतीनं उत्सवीकरण करण्याचं तंत्र वाजपेयी काळापासूनच अंगिकारलं आहे. तेव्हा जी अणूचाचणी केली गेली, त्याची जाहीरातबाजी, ढोलताशे हे सगळंच बालिश होतं. कारण ती काही पहिलीच चाचणी नव्हती. इंदिरा गांधींनी सर्वांत आधी अणुचाचणी केली होती. कारण अणुचाचणी, अंतरिक्ष मोहिमा यावर जगाची नजर असते. त्याचे राजकीय, भौगोलिक परिणाम होऊ शकतात. कुठलाही देश सशक्त होत असताना जागतिक समूहाची त्यावर करडी नजर असते. या नजरेला खटकणार नाही, पण आपलंही भरणपोषण होईल अशी धोरणं आखावी लागतात. म्हटलं तर ही तारेवरची कसरत असते. पण यालाच ‘आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी’ म्हणतात. पंडित नेहरूंपासून मनमोहनसिंगांपर्यंत सर्व कॉंग्रेसी नेत्यांनी ही प्रगल्भता दाखवली. भाजपच्या जल्लोषी संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर ती अगदीच रूक्ष वाटू शकते.**

भारतीय जनता पक्ष ज्या संघपरिवाराच्या मुशीतून जन्मला आहे, तिथंच या उथळ जल्लोषाची बीजं आहेत. संघपरिवार जी हिंदू संस्कृती मानतो, ती पुरोहितशाहीची, व्रतवैकल्यं, सणवार, उत्सव यांनी भरलेली, भारलेली आहे. त्यामुळे सनई चौघड्यांपासून रांगोळीपर्यंत सर्व साग्रसंगीत केलं की, ‘कार्य’ झालं असं मानणारा हा वर्ग आहे. त्यामुळे श्रीफळ वाढवण्यापासून सर्व गोष्टी मुहूर्तावर करण्याचा प्रघात या कार्यसंस्कृतीत आहे. संघ दावा करतो, त्याप्रमाणे संघात केवळ ब्राह्मण नाही तर सर्वच जातीजमातीचे लोक आहेत. असतीलही. पण हे प्रमाण संघात कमी, भाजपात जास्त! संघात आजही उच्चवर्णीय विशेषत: ब्राह्मणांचं प्राबल्य आहे!

संघाचा राजकीय विचार भाजपच्या माध्यमातून पुढे नेताना संघाचा ब्राह्मणी तोंडवळा बहुजन करण्यात संघाला यश आलं आहे. मात्र या बहुजनांना पुन्हा ब्राह्मणी धर्मकार्यसंस्कृतीत अडकवण्याचे सफल प्रयोग भाजपमध्ये दिसतात. त्यामुळे संघविचाराप्रमाणे राष्ट्रवादाचा उन्माद पसरवताना भाजपमधला बहुजन कडवा हिंदू होऊन मुस्लीमविरोधी होतो. तेवढाच धार्मिकही होतो. मग सत्यनारायणाच्या पूजेपासून वसूबारसपर्यंत हे ब्राह्मणीकरण घडवलं जातं. म्हणजे एका बाजूला ब्राह्मणातला एक मोठा वर्ग अंधश्रद्धाविरोधी, बुद्धिप्रामाण्यवादी, निरीश्वरवादी, नास्तिक, विज्ञानवादी होत असताना शाहू-फुलेंची परंपरा सांगणारा बहुजन वर्ग मात्र




भाजपच्या (आणि शिवसेना) नेतृत्वात टिळेधारी, गंडेधारी, महाराज-शिष्य आणि धार्मिक होताना दिसतो. त्यातूनच दहिहंडी, गणपती उत्सवातलं आक्रमक हिंदुत्व हे वारकरी भक्तीसंप्रदायातलं नसून पुरोहितशाहीतलं आहे, हे त्या भोळसट बहुजनांच्या लक्षात येत नाही. फक्त कधीतरी राजकारणात फटका बसला तर जागच्या जागी गाल चोळत ‘मायला ही बामनं लय हुशार’ असं पुटपुटण्यापलीकडे फार काही करू शकत नाहीत. कारण तोवर ते आपलं नशीब, कार्य, भविष्य हे ग्रह-ताऱ्यांवर अवलंबून आहे, हे मनोमन स्वत:लाच पटवून बसलेले असतात!

**हा सर्व पट मांडण्याचं कारण भाजपचा निवडणुकीतला विजय असो किंवा एखादा राजकीय निर्णय असो किंवा घोषणा असो, त्याचे ढोलताशे बडवण्यात हाच वर्ग मोठ्या प्रमाणावर असतो. त्याला ‘घडलंय’ नक्की काय, याची माहिती फार कमी किंवा नसतेच. पण त्याच्यावर हे बिंबवण्यात आलेलं असतं की, ढोल पिटायची आणि आरोळ्या मारायची वेळ आलेली आहे. यातला अभिनिवेश ‘रामाचा विजय’ यापेक्षा ‘रावणाचं दहन’ याचा जास्त असतो. आणि तो इंजेक्ट केलेला असतो!**

कलम ३७० आणि ३५-अ रद्द केल्यानं नेमकं काय काय होणार, हे अमित शहांच्या भाषणांचे व्हिडिओ यू-ट्युबवर पाहून ठरवणाऱ्यांना यावर फक्त ‘चेकाळायचं’ एवढंच माहीत असतं! गंमत म्हणजे संसदेत गृहमंत्रीही आपल्या निर्णयाचं लोकांना किती जल्लोषात स्वागत करावंसं वाटतंय, हे जाणून घेण्यासाठी संध्याकाळी टीव्ही लावा असं सांगत होते!

**म्हणजे संसदेत हजर सदस्य, विरोधी पक्ष, ती चर्चा लाईव्ह पाहणारे नागरिक, (खरे) पत्रकार यापेक्षा गृहमंत्र्यांना अर्धवट माहितीवर ढोल बडवणारे उठवळ समर्थक महत्त्वाचे वाटतात. बरं हे सर्व समर्थक ज्या राज्याबद्दल निर्णय घेतलाय, तिथले नाहीतच! हे इतर राज्यातले. कधीतरी हनिमूनला काश्मीरला जायचं स्वप्न बघणारे किंवा अमरनाथ, वैष्णवदेवी भक्तीभावानं करून येणारे. शिकारातून सफर करून बायकोला हौसेनं काश्मिरी पोशाख घालून फोटो काढून घेणारे, वैष्णवदेवीला गंडा मिरवणारे, तिथल्या काठ्या जपून आणणारे, शाली, अक्रोड, बदाम, केसर आणि शिलाजीत(ही) खरेदी करणारे!**

**कलम ३७०च्या राजकीय अजेंड्यापासून पूर्ण अनभिज्ञ आणि उजव्या टोळ्यांच्या राष्ट्रवादी प्रचाराला बळी पडून हरेक मुसलमान, काश्मिरी मुसलमान हा पाकिस्तानी समर्थक समजून काश्मीरमधून सुरक्षितपणे पुण्यात गेल्यावर स्थानिक चाणक्यांची पोपटपंची ऐकून ‘भारतमाते’बद्दल मत बनवणारा असा हा वर्ग!**

**याचा जल्लोष हा सरकारच्या निर्णयाच्या योग्य-अयोग्यतेचा पुरावा मानायचा? का गृहमंत्र्यांना हा सर्व पूर्वनियोजित स्टेज शो याच गॅलरीतल्या प्रेक्षकांसाठीच करायचा होता?**

७० वर्षं लोंबकळत असलेला, भारताच्या संवेदनशील सीमावर्ती राज्यातील एक घटनात्मक पेचप्रसंग बनलेला, आंतरराष्ट्रीय समुदायाला आपापल्या राजकीय ईप्सितासाठी सुयोग्य असा भौगोलिक प्रदेश असलेलं हे राज्य. त्याचा निर्णय घेण्यासाठी ज्या पद्धतीचं नेपथ्य रचण्यात आलं, दहशतवादी हल्ल्याची शक्यता दर्शवत अमरनाथ यात्रा गुंडाळण्याचा प्रवेश लिहिला गेला, दोन दिवसांत संपूर्ण राज्य जवळपास लष्करी तळात बदललं गेलं, सर्व संपर्क, दळणवळण, संदेशवहन यंत्रणा बंद केल्या गेल्या. आणि संसदेत बहुमताच्या जोरावर काही तासांत ७० वर्षं अस्तित्वात असलेल्या राज्याचे दोन तुकडे करून, ते दोन्ही तुकडे केंद्रशासित केले गेले. एक तुकडा राजकीय प्रतिनिधित्वाशिवाय नुस्ताच केंद्राच्या अखत्यारित. संसदीय लोकशाहीचे सर्व संविधानिक नियम, संकेत गुंडाळत राष्ट्रपती व राज्यपाल यांच्या अधिकाराचा वापर करून जो काही निर्णय त्या राज्यावर, पर्यायानं देशावर लादला, त्याचं उत्तर या उथळ जल्लोषात नि कृतक राष्ट्रवादी आरोळ्यात शोधायचं?

हा उथळ उठवळपणा इतक्या खालच्या स्तरावर की, महाराष्ट्र राज्याचा एक कॅबिनेट मंत्री गणपती मिरवणुकीत नाचावा तसा भारताचा ध्वज घेऊन नाचला! एक राज्य संपवलं, केंद्रशासित केलं, यावर दुसऱ्या राज्याचा कॅबिनेट मंत्री नाचतो? हे म्हणजे गवताच्या गंजीतली सुई शोधायला त्या गंजीलाच आग लावण्यासारखं!

ज्यांची मुळंच प्रश्न विचारायचे नाहीत अशा भूमीत रुजलेली, त्यांच्याकडून राजकीय शहाणपण, प्रगल्भपणा आणि संयम यांची अपेक्षा करणं तसं चुकीचंच हे पुन्हा... **पृष्ठ क्र. ११ वर**

# लोकशाही व राज्यघटनेचं पावित्र्य राखणाऱ्यांनीच, या देशाचा घात केलाय!

**स्टेट बँकेच्या १२ हजार कोटींच्या 'इलेक्टोरल बाँड घोटाळ्या'च्या विस्फोटक तपशीलावरुन जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, 'अगा जे घडलेचि नाही' अशा भाजपा कथित व रचित... 'दिल्ली-दारुकांडा'तल्या सैतानी-सत्तेच्या 'दारुची धुंदी' डोळ्यावर चढलेल्या; पण, आतून अत्यंत 'भयभीत' झालेल्या दिल्लीतील सत्ताधारी सैतानांना...२०२४च्या लोकसभा-निवडणुकीत पराभव डोळ्यासमोर दिसायला लागल्याचं अजून दुसरं प्रभावी लक्षण, काय असू शकेल...???**




**या देशाला घडवलं, स्वातंत्र्य मिळवून दिलं; त्यात वकिलीपेशाचं मोठं व महत्त्वपूर्ण योगदान होतं. डॉक्टर्स, प्राध्यापक-शिक्षक, तत्त्वज्ञानविषयावरील तज्ज्ञ मंडळी (नेताजी सुभाषचंद्र बोस, हे तत्त्वज्ञान विषयाचे पदवीधर होते) यांच्यासोबतच, 'वकिली पेशा'तूनच प्राधान्याने जास्त बुद्धिजीवी मंडळी राजकारणात येत होती... त्यांना समाजाची नाडी अवगत होती व समाजाप्रति 'जाण, ज्ञान आणि भान' होतं; म्हणूनच, ते घडत होतं! तेव्हा, डॉक्टरी, वकिली व प्राध्यापकी-शिक्षकीपेशाला समाजात फार मोठा मानसन्मान होता व बव्हंशी राजकारणी, याच उच्चशिक्षितवर्गातलेच असायचे. एकूण ३८९ घटना-समिती सदस्यांपैकी २५० सभासद, हे वकिलीपेशातूनच आलेले होते. घटना-समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, हे प्रख्यात वकीलच; तर, घटना-मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हे ही बॅरिस्टर होते.**

दादाभाई नौरोजी, सुंदरनाथ बॅनर्जी, मोतीलाल नेहरु, लो. टिळक, शरदचंद्र बोस (नेताजी सुभाषचंद्रांचे बंधू), सी. गोपालाचारी, लाला लजपतराय, मदनमोहन मालवीय, सी. आर. दास, सैफुद्दीन किचलू, भुलाभाई देसाई, म. गांधी, राजेंद्र प्रसाद, पं. जवाहरलाल नेहरु, कैलासनाथ काटजू (मार्कंडेय काटजूंचे आजोबा), अली बंधू (शौकत अली व मोहम्मद अली जोहर), अजमल खान, व्ही. जे पटेल, प्रताप गुहा रॉय, मौलाना आझाद...असे अनेक नामांकित वकील, स्वातंत्र्य-चळवळीत मोठं योगदान देणारे महान अग्रणी ठरले होते.

...ते देश घडवणारे, देशाप्रति समर्पित असलेले वकील-विद्वज्जन कुठे आणि आजचे मुकूल रोहटगी, हरीश साळवे, जेठमलानी, तुषार मेहतांसारखे व्यावसायिक यशाच्या 'विकारी-धुंदी'त देश बुडवणारे वकील कुठे? 'पाद्यपूजा' करण्याच्या लायकीच्या या तथाकथित बुद्धिमंत वकिलांनी... संपूर्ण वकिलीपेशालाच भयंकर काळीमा फासलेला आहे. श्रीकृष्णाने गीतेत वर्णिल्याप्रमाणे, ही 'सत्व'गुणाचा पूर्ण अभाव असलेली व रज, तम गुणांनी (खरंतर, अवगुणांनी) युक्त, अशी 'महापातकी मंडळी' आहेत. यांच्याच 'समाजघातकी' बुद्धिकौशल्यामुळे व सकल समाजाप्रति असलेल्या संवेदनशून्य-निगरगट्टवृत्तीमुळेच, आजचे दिल्लीश्वर हुकूम'शहा' (गुजराथी-लॉबी) भयंकर मातलेत!

...ज्यांच्या हाती, भारताची लोकशाही व राज्यघटनेचं पावित्र्य राखण्याची; तसेच, त्यांचं संरक्षण करण्याची जबाबदारी; त्यांनीच, या देशाचा 'घात' केलेला आहे. 'भांडवली-व्यवस्थे'ची तळी उचलून 'वाळवी'सारखं, या देशाला 'फोडा व झोडा' या नीतिने विद्वेष-गद्दारीचं विष पेरत साफ पोखरुन ठेवलंय.

**...स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी, ८०% भारतीय जनता निरक्षर होती आणि आता देशात ८०% पर्यंत साक्षरता वाढल्यानंतर; तुषार मेहता, हरीश साळवे, मुकुल रोहटगी, महेश जेठमलानी वगैरे तथाकथित बुद्धिमंत वकिलांची औलाद, या देशात दुर्दैवाने पैदा होऊन सर्वोच्च न्यायालयात धुमाकूळ घालताना राजरोस दिसत्येय! ही वकिली-औलाद रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेकडून (प्रामुख्याने, गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाकडून) पोसली जातेय आणि अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर, कंगना राणावतसारख्या निलाजरेपण अंगी भिनलेल्या 'विकाऊ' कलाकार-खेळाडूंकडून; तसेच, अनेक ढोंगी-बनावट धर्मसंप्रदाय चालवणाऱ्या बापू, बाबाजी, सद्गुरु, धर्मगुरुंकडून... उत्तेजना प्राप्त करतेय.**

आपल्या देशात बुद्धिमान लोकांची बिलकूल कमतरता नाही; पण, चांगली बुद्धी असणाऱ्या बुद्धिमंतांचा फार मोठा दुष्काळ पडलेला आहे, तो असा! त्यात वकील आहेत, डॉक्टर्स आहेत, शिक्षक-प्राध्यापक, कंपनी-व्यवस्थापक, तंत्रज्ञ असा सगळाच बुद्धिजिवीवर्ग आहे!

आज त्याचीच परिणती म्हणून या राम, कृष्ण, बुद्ध, महावीर, गुरु नानक, गांधी-नेहरु-मौलाना आझाद-नेताजी सुभाषबाबू, भगतसिंग, आंबेडकरांच्या देशात...हुकूमशाही, अन्याय-अत्याचार-शोषणाचा नंगानाच सुरु आहे.

**...सांगा, कुठल्या 'हिंदुत्वा'च्या परिभाषेत हा 'नंगानाच' बसू शकतो? हिंदुत्वाच्या परिभाषेत नव्हे; तर, हा नंगानाच 'हिंदुत्वा'च्या बुरख्याआड चाललेल्या राक्षसी 'हिडीसपणा'च्या परिभाषेत नक्कीच बसू शकेल. कृपा करुन हिंदूधर्माला बदनाम करण्याचं महापातक करु नका...हिंदूधर्म अथवा महन्मंगल 'भारतीय-अध्यात्म', ही 'कुबुद्ध' भाजपाई-संघीय लोकांच्या मर्यादित बुद्धीच्या आवाक्याबाहेरची बाब आहे. ते फक्त, परंपरेने चालत आलेले आत्यंतिक स्वार्थप्रेरित वर्णवर्चस्ववादी-शोषक धर्मसंप्रदायी 'ठेकेदार' आहेत किंवा पाशवी सत्तेचे 'सौदागर' आहेत, बस्स...धन्यवाद!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## 'पुनर्वाचना'साठी... आपल्या 'लायकीचे' सरकार 'आपल्याला' मिळते! ...पृष्ठ क्र. १० वरुन

एकदा दिसून आलं. शंभरावर माणसं केवळ रांगेत उभी राहून मेली, त्या नोटबंदीचं समर्थन करणारेच काल पुन्हा ढोल बडवत होते!

याला 'संमोहन' म्हणणं फारच चुकीचं ठरेल. कालचा जल्लोष, समाजमाध्यमावरची उन्मादी भाषा, विकृत संदेश पेरणी, हे सर्व मूर्ख, बिनडोकपणाचं आणि संविधानिक लोकशाहीचं राजरोस वस्त्रहरण करणारं. एक वचन आहे- लोकांच्या लायकीप्रमाणे त्यांना सरकार मिळतं! प्रश्न एवढाच आहे, ही अशी 'नालायकी' आणखी किती वर्षं आपण सिद्ध करत राहणार?

*लेखक संजय पवार प्रसिद्ध नाटककार व पटकथाकार आहेत.*



# ‘‘समुद्राची साद’’



किंग सामन मासा युकोन नदीवर झुकलेल्या ढगात जन्मतो, अगदी, अगदी उगमापाशी. तिथे त्याची आई खळखळ वाहणाऱ्या पाण्याच्या कडेला घरट्यासारखे खळगे करते. यात पाणी पाळण्यासारखे सावकाश हलते. छोटे सामन या pebbles च्या घरट्यातून पहिल्यांदा नदी बघतात.

आणि मग कुठल्या दूर समुद्राची हाक त्यांना ऐकू येते की, ढगातले आपले घर सोडून सगळे खळखळ-नदीतून मोठ्या नदीत, मोठ्या नदीतून विस्तीर्ण खाडीत आणि खाडीतून पार, पार खाऱ्या समुद्रात जातात.

कुठे जातात, तिथे काय खातात, गोड्या पाण्यातले जीव इतक्या खाऱ्या पाण्यात कसे जगतात हे आपल्याला काही माहित नाही.

**पण खरी किमया होते ती नंतर. जेव्हा या खाऱ्या खलाशी सामन माशांना अंडी घालायची असतात तेव्हा मात्र समुद्रातल्या लाखो, करोडो लिटर खाऱ्या पाण्यातून ते आपल्या जन्म नदीचा एक थेंब ओळखतात आणि एक अशक्य प्रवास सुरु करतात. किंग सामान मासा ३,२०० किमी प्रवाहाच्या विरुद्ध पोहून समुद्रातून आपल्या नदीत परत येतो. परत त्याच ठिकाणी जिथे त्याचा जन्म झाला. गोड्या पाण्यातून खाऱ्या पाण्यात आणि परत गोड्या पाण्यात. डोंगरात पोहोचेपर्यंत माशाच्या खवल्यावरची चंदेरी चमक विरते, खाणे पूर्ण बंद होते, शेपटीचा झोक केविलवाणा होतो, नजरेतील आग विझू लागते.**

पण आपल्या घरी पोहचेपर्यंत मासा इथे तिथे बघत नाही आणि तिथे अंडी देऊन, त्यांना त्यांच्या सावकाश झुलणाऱ्या पाण्याच्या घरट्यात ठेवल्यावर तो आकाशाकडे डोळे करून पाण्यावर शांतपणे तरंगतो. पाण्यात बुडतो.

यांचे सगळेच विलक्षण. पण सगळ्यात विलक्षण म्हणजे यांना घरचा रस्ता कसा सापडतो? आम्ही एक-दोन वळणं चुकलो की नव्या गावाला जातो, हे मासे परत घरी कसे येतात? आर्क्टिक टर्न पक्षी हजारो किमी उडायला कोणता नकाशा वापरतात? सई मांजर एकदा नव्या घरातून पळून गेली होती. एक महिन्याने ती घरी कशी आली?

कोण रस्ता दाखवतं यांना? कुठला नकाशा? काय खुणा असतात यांच्या घरच्या? पण रस्ता मात्र बिनचूक. मग तिथे काहीही होऊ द्या. सामन माशांच्या मार्गात धरण आले, तर ते धरणाच्या भिंतीवर डोकी आपटत राहतात, त्यांना पाण्याच्या टाकीत ठेवले तर migration season मध्ये आपल्या नदी उगमाच्या दिशेला डोके करून टाकीत पोहत राहतात. असेच पक्ष्यांचे. पिंजऱ्यातदेखील आपल्या मार्गाच्या दिशेला उडण्याचा प्रयत्न करत राहतात.

**याला म्हणतात** Zugunruhe. **ठरल्यावेळी ठरल्या ठिकाणी पोहोचण्याची जीवघेणी धडपड. पक्ष्यांमध्ये याचा खूप अभ्यास झाला आहे. माशातदेखील दिसते. काही माणसात पण.**

**हे सगळं परवा आठवलं कारण त्रिंबकेश्वरला गेलो होतो आणि तिथे ‘‘पवित्र’’ गोदावरी** slab **खाली बिनबोभाट वाहत होती. हु नाही आणि चु नाही. वर भाजी बाजार. रस्ता. नदीवर बसलेले लोक मेथी विकत होते, भक्तगण ओलेत्या अंगांनी, ओशट पुण्यप्राप्तीचे** expression **घेऊन इथे तिथे फिरत होते. गायी शांत रवंथ करत होत्या. संगमेश्वराचे छोटे मंदिर रस्त्यात उभे होते. ज्या नीलगंगा आणि गोदावरीचा संगम तिथे कधी काळी होत होता, ती जागा आता ६** feet under **गेली होती.**

जे गाव आपली उपजीविका एका नदीच्या उगमामुळे मिळवते त्याने त्या नदीला गाडून टाकलं होतं आणि वरवर सगळं अलबेल होतं.

आणि दुसऱ्याच दिवशी संततधार पाऊस झाला. नद्यांनी आपला ओळखीचा रस्ता घेतला, जणू मधली वर्षे कधी घडलीच नाहीत, जणू कॉन्क्रीट नदीत पडलंच नाही, बाजार वर बसलाच नाही, तेलकट पंडितांनी सोयीचे मंत्र म्हटलेच नाहीत.

संगमेश्वरच्या मंदिराजवळ संगम व्हायचा तो झाला.

सगळ्या पुसलेल्या रेषा परत निळ्या झाल्या.

DP Map वरचे रस्ते, बिल्डींग, पार्किंग क्षणात नाहीसे झाले.

नदीला तिचा रस्ता माहित होता. ती आपल्या जव्हार डावीकडे आणि नाशिक सरळ या बोर्डांकडे बघत नव्हती. हे पुण्यात झाले, मुंबईत झाले, दिल्लीत झाले. पथ वापरात आले.

आणि हे तर नवे रस्ते. नदीचे Paleo Channels, म्हणजे तिने सोडलेले, बदललेले शेकडो, हजारो वर्षांपूर्वीचे रस्तेदेखील पुरात फुलून येतात. बिनचूकपणे नदी समुद्राकडे जाण्याचा सगळ्यात जवळचा मार्ग धरते आणि रस्ता कापत जाते. मध्ये आपण उभे असतो, ती नाही.

बिहारमध्ये, पंजाबमध्ये, बंगलामध्ये Paleo Channels वर अजूनही अभ्यास होत आहे. पूर आले की हे रस्ते परत गजबजून उठतात, उठणार आहेत.

आपण पथिक. हे सगळे मात्र पृथ्वीची परिक्रमा आपल्या फार आधीपासून करत आहेत. आपण बुजवलेले, बदललेले, कापलेले रस्ते यांचे जुने मित्र आहेत.

छोटी सी ये दुनिया, पहचाने रास्ते है, तुम कहीं तो मिलोगे, तो पूछेंगे हाल!

# पावसाचे पाणी समुद्रात फुकट जातंय का?

‘‘नदीचे सागर मिलन’’

‘‘पुन्हा होऊन लेकरू
नदी वाजविते वाळा,
पान्हा फुटतो डोंगरा
आणि येतो पावसाळा’’

गदिमांच्या या आशयघन कवितेतील, नदीच्या सागर मिलनाचे अर्थगर्भ नाट्य, भाव-तरल भाषेने , कोकणी रानमाणूस (प्रसाद गावडे ) आपल्या काळजाला साद घालत आहेत.

तसेंच.....

सृष्टीने आरंभलेल्या महानाट्याचा अर्तक्य व अशक्य वाटणारा पावसाचा एक अदभूत खेळ, पृथ्वी व अवकाशाच्या रंगमचावर चालू होतो ... आणि सामन मासे, तिबोटी खंड्या, पावश्या ,मृगाचे किडे आणि लुकलूकाणाऱ्या काजव्यांच्या सुरात ताल मिळवणारे पावसाचे मिलन-संकेताचे संगीत, सृष्टीच्या पावसाळी ऋतूचक्रातील अश्याच असंख्य जीवांच्या गर्भात अनादी सृजनाचा अमृतमय अंकुर रुजवते .

पण आता, अरण्य, नदी, डोंगरासारख्या पंचमहाभूताच्या अदभूत जीवन अविस्काराने विस्मित होणाऱ्या प्राचीन मानवाची श्रद्धाळु संस्कृती विनाश पावत आहें, त्या विपरीत, अहंकाराने बेकाबू मानवाने निसर्ग काबूत ठेवण्यासाठी विनाशकारी अविष्कारांनी समस्त मानव संस्कृतीच नव्हे तर संपूर्ण पृथ्वीची मानव जातच विनाशाच्या सीमेवर आणली आहे.

परिणीता दांडेकर या पावसाच्या जिवनदायी सर्जनाच्या अदभूत खेळाच्या अनुभूतीत चिंब भिजवतात. अशीच कधीकाळी वाचनात आलेली सुंदर कथा आपल्याला नक्कीच विचार करायला उद्दूक्त करेल

विलास
मैत्र जीवांचे

...परिणीता दांडेकर – Associate Co-Ordinator, South Asia network on dam, river and people

# गांधी समजुन घेताना...

**परवा सोशल मीडियावरच्या ग्रुपमधील, एका १८–२० वर्षांच्या परिचित कोवळ्या तरुणानं, वैयक्तिक मेसेज करुन प्रश्न विचारला, शाळेत असताना २६ जानेवारी/१५ ऑगस्टला, नेहरु–गांधी–सरदार–सुभाष–टागोर–इंदिरा यांची वेशभूषा करुन, आम्ही स्पर्धेत भाग** घ्यायचो; पण, कधीच कुणी हेडगेवार–गोळवलकर–**गोडसे आजही का होत नाही?**

**तरुणांच्या शंका मी कधीच टाळत नाही; कारण, त्यांच्यामुळे अनेकदा स्फुर्ती मिळते, ज्ञानात भरच पडते. आजचा हा लेख याच भावनेतून लिहिला गेलाय...**

स्वातंत्र्य मिळण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया, तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान टर्लीनी तेथील संसदेत INDIA INDEPENDENCE ACT–१९४७ मंजूर केल्यानंतर सुरु झाली. २६ जानेवारी–१९५० रोजी, हा कायदा संपुष्टात येऊन 'भारत नावाचं संघराज्य' जगाच्या नकाशावर आले... परंतु, तत्पूर्वीच ही सर्व प्रदिर्घ प्रक्रिया सुरु असतानाच; बहुसंख्य, म्हणजे सुमारे ५५० संस्थानिक राजा–महाराजांनी स्वतंत्र भारतात सामील होण्यास नकार देत, ब्रिटीशांनी जसा देश आमच्या ताब्यातून घेतला होता, तसाच तो आमच्याकडे सोपवा, अशी मागणी करायला सुरुवात केली.

१७५७च्या प्लासीच्या लढाईतील ब्रिटिशांचा विजय ते १८१८पर्यंत पेशवाई बुडवेपर्यंत, बहुतेक संस्थानिकांनी इंग्रजांसमोर नांगी टाकून त्यांच्याकडून तनखे आणि तैनाती फौज स्विकारुन ब्रिटिशांशी जमवून घेतले.(अपवाद फक्त, टिपू सुलतान आणि यशवंतराव होळकर)

या संस्थानिकांना, त्यांच्याच राज्यातील दरिद्री आणि निरक्षर जनतेशी काहीही देणे–घेणे नव्हते. त्यांना काळजी होती ती, आपली सरंजामशाही स्वातंत्र्यानंतर कायमची जाण्याची. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, पहिल्या तीन वर्षांतच पं. नेहरुंच्या नेतृत्त्वाखाली, त्यांचे ज्येष्ठ सहकारी सरदार पटेलांनी खंबीरपणे या संस्थानिकांचा माज उतरवून त्यांना स्वतंत्र भारतात सामील होण्यास भाग पाडले. 'The story of accession of states' by V. P. Menon या सरदारांच्याच सचिवानं या पुस्तकात हे सर्व विस्तृतपणे मांडले आहे. पुढील काळात तर, इंदिरा गांधींनी पंतप्रधान झाल्यानंतर, त्यांचे तनखेदेखील बंद करुन, ऐशोआरामाला सोकावलेल्या या राजे–महाराजांचं अस्तित्वच संपुष्टात आणलं!

**मित्रांनो, गांधीचं महत्त्व लक्षात येऊ लागतं ते इथंच... म्हणजे, हा इतिहासाचा विस्तृत कॅनव्हास माहित करुन घेतल्यानंतरच. संस्थानिकांची ही, इंग्रजधार्जिणी मानसिकता आणि ब्रिटीश सत्तेकडून होत असलेले भारतीय जनतेचे सततचे सर्वांगीण शोषण, इंग्रजी शिक्षण–पद्धतीमध्ये साक्षर झालेले बाबू, यामुळे ब्रिटिश सरकार मजबूत होत होते; तर, दुसरीकडे हिंदी जनता मात्र, दिवसेंदिवस भुकेली आणि कंगाल होत चालली होती. (दादाभाई नौरोजींनी मांडणी केलेल्या** Drain Theory**मध्ये नेमके हेच वर्णन केलेले आहे. त्यानंतर सुमारे २०–२५ वर्षांनी गांधींच्या हाती स्वातंत्र्यलढ्याचं नेतृत्व आल्यानंतर तर, ही परिस्थिति आणखीनच बिघडत चालली होती, असो)...**

आता, या स्थितीत स्वातंत्र्य चळवळीला एका विशिष्ट मुल्यांची जोड दिली पाहिजे, हे सर्वप्रथम ओळखले ते गांधींनीच. चळवळीत येण्याआधीच,१३ एप्रिल–१९१९च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर बळी गेली ती, निरपराध सर्वसामान्य गोरगरीब जनताच, हे गांधींनी उघड्या मन:चक्षूंनी पाहिलं होतं... अंतर्मनानं जाणून घेतलं होतं. सारा देश तर, पुरता हादरुनच गेला!

**इंग्रजांचं साम्राज्य अवाढव्य, प्रचंड लष्करी ताकद आणि सैन्य, अत्याधुनिक शस्त्रास्त्र व दारुगोळ्यांनी सज्ज. ब्रिटिश सरकारला हिंसक पद्धतीने विरोध केला तर, काय होऊ शकते, हेच या हत्याकांडाने इंग्रजांनी सिद्ध केले. गांधींनी सर्वप्रथम हे वास्तव जाणून घेतलं. इथं, क्रातिकारकांच्या कार्याचं मोल अजिबात कमी होत नाही; पण, त्याला वास्तवात खूप मर्यादा होत्या. सर्वसामान्य लोक चळवळीपासून कोसो दूर असताना,**

आजच्या भाषेत गांधींकडे ना दिलखेचक व्यक्तिमत्व होतं, ना भुरळ पाडणारी भाषा. परंतु, तरीही जनतेनं गांधींचाच मार्ग स्वीकारला आणि पुढे त्याचीच जनचळवळ झाली, तिने त्याच मार्गाने पुढील प्रवास करत स्वातंत्र्यप्राप्तीचं ध्येयही गाठलं.

**स्वातंत्र्य लढ्याची चळवळ अशी सर्वसमावेशक होत असतानाच, तिला समानतेच्या मूल्याचं परिमाण, गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने दिलं. त्यासाठी स्थानिक नेतृत्वाला प्रोत्साहन देत चळवळीची धार वाढवत नेली. परंतु, तिला कधीही अहिंसेच्या मार्गापासून भरकटू दिले नाही. (अपवाद फक्त १९२२च्या चौरीचौरा येथील पोलीस चौकीला आग लावून, पोलीसांना जिवंत जाळण्याच्या घटनेचा. पण, या हिंसक घटनेनंतर, गांधींनी चळवळ तात्काळ थांबवली. अनेकजण त्यामुळे नाराजही झाले, तरी गांधींनी पर्वा न करता, पुन्हा जनतेला अहिंसेच्याच मार्गावर आणले.)**



**आपण केवळ काही क्रांतिकारकांनाच सुळावर चढताना पाहत बसायचे?**

**लोकमान्य टिळकांनंतर, ऑगस्ट–१९२०मध्ये, स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधींकडे आले आणि त्यांनी ही चळवळ सर्वसमावेशक बनवायला सुरुवात केली, ती त्यामुळेच. सरंजामशाहीच्या** (Feudalism) **मानसिकतेतून जनतेला बाहेर काढण्यासाठी, त्यांनी अहिंसेबरोबरच सविनय कायदेभंग, असहकार, स्वदेशी शिक्षण या आयुधांचा कल्पकतेने वापर केला. तो केला नसता तर, हिंसेच्या मार्गात असंख्य गोरगरीब, अशिक्षित, शोषित ब्रिटिशांकडून हकनाक मारले गेले असते.**

गांधींचा मीठाचा सत्याग्रह तर, भल्याभल्यांना समजलाच नाही. दुष्काळात सरकारने मिठावर कर वाढविल्याच्या निषेधार्थ, त्यांनी साबरमती ते दांडी अशी अवघ्या ८० सहकाऱ्यांसोबत काढलेली ३०० कि.मी.ची दांडीयात्रा स्वातंत्र्यलढ्यासाठी ब्रह्मास्त्र उहरपसशी ठरली. गदिमांच्या भाषेत सांगायचं झालं तर, उचललेस तू मीठ मूठभर, साम्राज्याचा खचला पाया

असा हा या यात्रेचा महिमा!

मूठभर क्रांतिकारकांनीच आहुती देण्यापेक्षा, सर्वसामान्यांनीच आता लढ्यात उतरावे, हा गांधींचा उलटा प्रवास!


(आज राहुलचं राजकारणही गांधींच्याच मार्गावरुन पुढे जाणारं आहे... आजच्या रुढ राजकारणाच्या पूर्णत: विरुद्ध! असो, आजच्या लेखाचा तो विषय नाही.)

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीमार्गाने, धर्मनिरपेक्षतेवर आधारित जनतेचं राज्य येणार आणि त्यात संस्थानिक, त्यांचे हुजरे यांना काहीही स्थान नसणार, हे स्पष्टच झाल्यावर याच मंडळींनी कोल्हेकुई करत गांधींना विरोध सुरु केला.

मध्ययुगीन सरंजामशाही आणि ब्राह्मणशाही यांना झुगारुन देत, दलित–सवर्ण, गरीब–श्रीमंत, महिला–पुरुष अशी समाजातील विभिन्न स्तरांची मोट बांधून काँग्रेसने स्वातंत्र्यलढा उभारला. युरोपातील प्रबोधनकाळ, उदारमतवाद, फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांतींनी दिलेली मूल्यं स्वीकारत, स्वत:च्या मूल्यांची त्यात भर टाकून, जगाला प्रेम–अहिंसा–शांती–मानवतेचा संदेश देणारा ऐतिहासिक स्वातंत्र्यलढा उभारला तो गांधींच्या काँग्रेसनंच. नेमकं हेच काहींना नको होतं, त्यांना हवा होता, तो ब्रिटिश पूर्वकालीन, मध्ययुगीन हिंदुस्थान... जिथं केवळ ठराविक वर्गाचंच वर्चस्व असणार होतं. गांधींना विरोध होऊ लागला, तो याच वर्चस्ववादी मानसिकतेतून. ठडड आणि हिंदू महासभेची स्थापना झाली, ती हीच मानसिकता बळकट करण्यासाठी!

**१९३४ सालीच गांधींच्या हत्येचा पहिला प्रयत्न होत असताना, दुसरीकडे दोनच वर्षांनी सावरकरांनी, द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला, हा काय निव्वळ योगायोग होता काय? गांधी–हत्येसाठी पिस्तूल कुणी पुरवलं? कोणत्या संस्थानिकांनी पडद्याआड मदत केली? स्वतंत्र भारतात सामील होऊ नका म्हणून, संस्थानिकांना पत्रं लिहिली कुणी? अल्वरच्या संस्थानिकानं तर,**

# मार्क्स म्हणाला...



### १. मार्क्सची भेट!

नारायण सुर्व्यांप्रमाणे
मलादेखील मार्क्स भेटला,
पहिल्या भेटीतच
फार टोचून बोलला,
तू चोर आहेस म्हणाला.
मी म्हटलं, 'ठाऊक आहे,
गांधीने सांगितलंय मला.'
तो पुन्हा म्हणाला, 'खरोखरचा चोर
आहेस तू!
गांधी म्हणाला असेल की, तू गरजेपेक्षा
जास्त साठवतोस म्हणून चोर.
ते त्यागण्यात मोठेपणा वाटला असेल
तुला.
स्वेच्छेची गरिबी, म्हणजे मोठेच उपकार
वाटले असतील तुला.
पण मी पुन्हा सांगतो,
'तू खरंच चोर आहेस.
तुझा बाप चोर होता,
तुझा आजा चोर होता,
तुझं अख्खं खानदान चोर होतं.'
एकापुढे एक युक्तिवाद करत गेला, माझा
मेंदू सोलत गेला.
किती भयानक माणूस हो, हा दाढीवाला!
'मी श्रमचोर आहे' याची खात्री
दिल्यानंतरच शांत झाला.
आणि
तरीही, मला कायमचा नादी लावून गेला!
प्रत्येक संपत्तीचं मूळ शोधण्याची खोड
लावून गेला!

### २. मार्क्स म्हणाला!

मार्क्स म्हणाला,
'धर्म ही अफूची गोळी असते',
हे जसं लक्षात ठेवलंस,
तसंच, 'धर्म हा निर्दयी जगाचा ओलावा',
हे देखील लक्षात ठेव.
'द्वंद्वात्मक भौतिकवादाचे दर्शन',
हे जसं लक्षात ठेवलंस,
तसंच, 'करुणा माझी प्रेरणा होती',
हे देखील लक्षात ठेव.
'विरोधी वर्गातील संघर्ष',
हे जसं लक्षात ठेवलंस,
तसंच, 'काही विरोध मैत्रभावी असतात',
हे देखील लक्षात ठेव.
'परिस्थिती विचार प्रसवते',
हे जसं लक्षात ठेवलंस,
तसंच, 'विचारही परिस्थिती प्रभावित
करतात',
हे देखील लक्षात ठेव.
'क्रांतिचा सिद्धांत विज्ञाननिष्ठ हवा',
हे जसं लक्षात ठेवलंस,
तसंच, 'व्यवहारदेखील विज्ञाननिष्ठ हवा',
हे देखील लक्षात ठेव.

### ३. साधे सोपे

मार्क्स म्हणाला,
इतकं साधं सोपं तुला कसं कळत नाही?
अरे, 'नैसर्गिक पदार्थ अधिक श्रम म्हणजे
वस्तू असते'.
मग, नैसर्गिक पदार्थाचे मूल्य, तू कोणाला
देणार?
म्हणून, 'त्यातील श्रम, हेच मूल्य असते'.
इतकं साधं सोपं तुला कसं कळत नाही?
अरे, 'विनिमय दोन समान मुल्यांमध्ये
होतो'.
मग, 'दोन्ही बाजुला सारखे श्रम
असल्याशिवाय व्यवहार कसा होणार'?
म्हणून, 'कमी श्रम घालून जादा श्रम
मिळवणे', हा फायदा नव्हे; लावलेली
शेंडी असते.
इतकं साधं सोपं तुला कसं कळत नाही?
अरे, 'तिजोरीत ठेवलेला पैसा कधी अंडी
घालत नसतो'.
मग, 'उसना दिलेला पैसा व्याज कसे
प्रसवणार'?
म्हणूनच 'नफा, व्याज, भाडे...ही सगळी
श्रमचोरी असते'.
इतकं साधं सोपं तुला कसं कळत नाही?
अरे, हवा आणि पाणी कोणाच्या बापाचं
नसतं.
मग, 'जमीन कशी कोणाच्या बापाची
असेल'?
म्हणून, खाजगी मालकी हा 'चकवा'
असतो.

### ४. धर्म!

मित्र म्हणाला,
'तू तर मार्क्सवादी!
म्हणजे धर्म विरोधी.
म्हणजे जडवादाची सद्दी.
तुला धर्माची काय महती?'
मी हसलो आणि म्हणालो,
''मार्क्सनेच मला कर्मठ केलं!
स्थूलाकडून सूक्ष्मात नेले!
चित्तशुद्धीचे मार्ग शिकवले!
पूर्वीपेक्षा अधिक 'धार्मिक' बनवले!''
''काय?'' मित्राने आश्चर्य केले.
''मार्क्स म्हणाला,
निर्भयतेने सत्य ओळख!
लुटीला लूट म्हण...
शोषणाला शोषण म्हण...
तुझ्या जातीने केलं तरी म्हण...
तुझ्या खानदानाने केलं तरी म्हण...
सत्य बोलण्याचे व्रत घे!
तोच तुझा स्वधर्म आहे!
लक्षात ठेव,
शोषित असंख्य असले; तरी शोषक
मुठभरच असतात.
शोषितांच्या भ्रमानेच ते राज्य करतात.
म्हणून शोषितांचा भ्रम तोड.
'वरकड-मूल्या'चे रहस्य फोड.
कीर्तनं कर, प्रवचनं कर.
मगच हिंसेचा अंत होईल.
अहिंसेचे राज्य येईल.
तोच तुझा स्वधर्म आहे!
'सब है भूमी गोपाल की
नही किसीकी मालकी',
हे लक्षात घे.
म्हणून, तुझ्या संपत्तीचा धांडोळा घे.
तुझ्या श्रम-पैशाचा ताळमेळ घे.
अस्तेयाचे व्रत घे.
तोच तुझा स्वधर्म आहे!
भांडवलाचे केंद्रीकरण होऊ देऊ नकोस.
म्हणून, तू देखील लोभाला बळी पडू
नकोस.
तेच अनर्थाचे मूळ आहे.
सार्या दुःखाचे कारण आहे.
म्हणून अपरिग्रहाचे व्रत घे.
तोच तुझा स्वधर्म आहे!
सुखाची पर्वा तू करु नकोस.
भोगाची आस तू बाळगू नकोस.
मायावी दुनियेला फसू नकोस.
जनतेतला जनार्दन विसरु नकोस.
त्याच्याच मध्ये मिसळून जा.
सायुज्य मुक्ती अनुभवत जा.
तेच तुझे प्रारब्ध आहे.
आणि, तोच तुझा स्वधर्म आहे!''

...डॉ. रुपेश पाटकर

## गांधी समजुन घेताना...

...पृष्ठ क्र. १३ वरुन

**गांधींचे तुकडे करुन ते कुत्र्यांना खायला घाला, ...पृष्ठ क्र. १४ वर अशी प्रक्षोभक भाषेतील छापील पत्रकंच जाहीरपणे वाटली होती.**

**पाकिस्तानसाठी ५५ कोटींची तरतूद ही, ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केलेल्या कायद्यानुसार होती आणि नेहरुंच्या तत्कालीन मंत्रीमंडळाने ती मंजूर करताना, जनसंघाचे डॉ. शामाप्रसाद मुखर्जीही होतेच. त्यांनी याला विरोध केल्याची नोंद नाही.**

**मुद्दा हा की, धर्मनिरपेक्ष भारतीय प्रजासत्ताकाची स्थापनाच धडपणे होऊ नये म्हणून ठडड, जनसंघ, हिंदू महासभा अस्वस्थ होऊन अप्रत्यक्षपणे जीनांनाच पूरक कार्य करीत होती आणि त्यासाठी हवा तितका रक्तपात करायचीही त्यांची तयारी होती... हे सर्व हिंदुराष्ट्राच्या नावाखाली चालले होते.**

या सर्वांची परिणती अशी झाली की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील, सुमारे दहा वर्षे भारतात कुठे ना कुठे धार्मिक दंगली-हिंसा चालूच होत्या. अनेकदा वृत्तपत्रात तशा बातम्याही येत असल्याचे माझी आजी मला लहानपणी नेहमी सांगत असे. यावरुन, फाळणीची जखम ही, प्रदीर्घकाळ कशी भळभळत राहिली होती, हे वाचकांच्या लक्षात आलंच असेल.

माझे पणजोबा हे, भारत-छोडो आंदोलनात ब्रिटिश सार्जंटच्या (आजचा इन्स्पेक्टर) सोट्याचा फटका डोक्यावर बसल्यामुळे, रक्तबंबाळ अवस्थेतच गायब झाले व खोट्या नावाने उपचार घेऊन थोडे बरे झाल्यावरच घरी परतल्याचे आजी सांगे. वाचनाची आवड असल्याने, सर्वप्रकारची अद्ययावत माहिती तिच्याकडे मरेपर्यंत असायची. त्यामुळे आम्हाला बऱ्याच गोष्टींची माहिती आपसूकच व्हायची.



# घोडबंदर सर्व्हिस रोडच्या विलीनीकरणाची निविदा प्रक्रिया रद्द करा!

*उशीर कितीही झाला असला; तरीही, 'प्रहार 'हा मुळावरच व्हायला हवा! ''माणसांना घरं नाहीत व घरांना माणसं नाहीत'', हा फ्लॅट–साठेबाजीचा घृणास्पद प्रकार थांबवलाच पाहिजे व तद्नंतर किंवा त्याचसोबत, एकाच्याच मालकीची अनेक दुकाने, हा प्रकारही पोलादी हाताने रोखला गेलाच पाहिजे. ''प्रत्येक प्रौढ व्यक्तिच्या मालकीचे फक्त एक दुकान, एक मकान'', धोरणातून एकाचवेळी अनेक दुकानांच्या गाळ्यांचे निर्गल साठेबाज असलेल्यांच्या नाकात वेसण घातली गेलीच पाहिजे... शहरं–उपनगरांतून जवळपास सर्वच दुकानांवर भुजंगासारखे वेटोळे घालून बसलेल्या जमातीला, कायदेशीर–प्रक्रियेतून विस्थापित केल्यानंतर सरकारने ते ताब्यात घेऊन गरजू–होतकरु मराठी–तरुणाईला वाजवी भाड्याने व प्रसंगी बीजभांडवल पुरवून धंदा–व्यवसायासाठी वितरीत केले पाहिजेत!*




रायगड जिल्ह्यातील तळोजा एमआयडीसीमधील, 'श्रीहंस इलेक्ट्रिकल प्रा. लि.' या कंपनीतील 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'च्या स्थानिक–भूमिपुत्र, कायम–कुशल कामगार सदस्यांनी, कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभार आणि अन्यायी वर्तणुकीविरोधात, दि. ४ मार्च–२०२४ रोजीपासून बेमुदत साखळी व आमरण उपोषण सुरु केले असून, याच पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे सचिव श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. नरेंद्र पंडित, ऐरोली विधानसभा सचिव श्री. सिद्धेश सावंत–भोसले, 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यालयीन कर्मचारी श्री. संजय दळवी, प्कोटेक्स कंपनीतील युनियन प्रतिनिधी श्री. महेश पडवळ, श्री. संतोष भोईर आणि इतर कामगार सदस्यांसह, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित, 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'च्या अंतर्गत कार्यरत असलेल्या 'स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा–टॅक्सी चालक–मालक संघटने'चे श्री. गोपीनाथ भगत, श्री. महेंद्र म्हात्रे यांनी, 'श्रीहंस'च्या उपोषणकर्त्या कामगार सदस्यांची मंगळवार, दि. ५ मार्च–२०२४ रोजी भेट घेतली. यावेळी, **''लोकशाहीमार्गाने सूरु असलेल्या या कायदेशीर लढाईतून आपल्याला यश मिळणार असून, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत, त्यामुळे अंतिम विजय हा आपलाच होणार आहे!'' अशी ग्वाही महासंघाचे सचिव श्री. समीर चव्हाण यांनी, उपोषणकर्त्या कामगार सदस्यांना देऊन त्यांचे मनोधैर्य वाढवले.**

**भारताचं काय व्हायचं ते होईल परंतु,महाराष्ट्रापुरतंच सांगायचं तर,भाजपकडून इथल्या राजकारणाचं/ समाजाचं जे उत्तरभारतीयीकरण सुरू आहे,त्याविरोधात छत्रपतींच्या महाराष्ट्र-धर्माची स्थापना करण्यासाठी मराठी माणसांची चळवळ उभारणे,हे कधी नव्हे इतकं अत्यावश्यक बनले आहे. अन्यथा,महाराष्ट्राचे अस्तित्वच संपले म्हणून समजा!**

**- रुद्रेश सातपुते**

रुद्रेशजी,

उत्तर भारतीयांचं आक्रमण कधि ना कधि परतवता येईल किंवा प्रशांत किशोरसारख्यांच्या हातून नजिकच्या भविष्यात सुदैवाने बिहारचा कायापालट झालाच; तर, परिस्थितीत आमूलाग्र बदल एकवेळ होऊ शकेल (कारण, उत्तर भारतीयांकडे कितीही संख्याबळ असलं; तरी, धनसंपत्तीचं तेवढ्याप्रमाणात बळ नाहीच); पण, धनाढ्य गुजराथी–भाषिकांना निपटून काढणं, जेवढं अत्यावश्यक आहे, तेवढंच ते कमालीचं अवघड आव्हान आहे. कारण 'महालक्ष्मी' आणि महालक्ष्मीच्या प्रभावाने 'राजलक्ष्मी' त्यांच्या हाती एकवटली गेली आहे आणि विधिनिषेधशून्य–अनितीमान स्वरुपाची, त्यांच्या जमातीची 'संघटन–शक्ति', महाराष्ट्राचं अवघं जगणंच ग्रासून आहे...हे अनेकांना आकळत नाही किंवा ते साधं कबूल करण्याची ते हिंमत दाखवू शकत नाहीत व तेच महाराष्ट्राचं मोठं दुर्दैव आहे!


भांडवली–व्यवस्थेतल्या 'कंत्राटी–कामगार पद्धत आणि आऊटसोर्सिंग'च्या शोषण–दमन तंत्रातून 'अस्तित्ववादी–गुलाम' बनलेल्या उत्तर भारतीयांना, पोटापाण्यासाठी वणवण करणाऱ्या मायमराठ्यांविरुद्ध, महाराष्ट्राच्याच औद्योगिक नकाशावर उभे करत...उत्तर भारतीयांची व मराठ्यांची आपापसात 'झोंबी' लावून देणं, हे गुजराथी–भाषिक भांडवलदारवर्गाचंच षडयंत्र आहे! त्यात, आता भरीसभर म्हणून, कामगार–चळवळच साफ मोडून काढण्यासाठी चार काळ्या कामगार–कायद्यांची 'काळी कामगार–संहिता' गुजराथी–लॉबी'कडून देशभर लादण्यात आलीय.

तेव्हा, भ्रष्ट–दलाल मराठी राजकारणी मनगटशहांचा हात धरुनच बळकट केला गेलेला...धनदांडग्या–मुजोर गुजराथ्यांचा महाराष्ट्रातला खुंटा हलवा, बाकी सगळे आपसूक निमूटपणे जागेवर येतील...

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*...ज्याने, ईडीच्या दबावाखाली इलेक्टोरल बाँडच्या रुपाने एकूण ५५ कोटींची लाच दिली व जो, जबरदस्तीने सरकारी 'माफीचा साक्षीदार' बनवला गेला (ज्याने, तुरुंगात काही महिने घालवल्यावर, सरतेशेवटी ईडीला शरण जाऊन, ईडीच्या सांगण्यानुसारच आपल्या सुटकेसाठी अरविंद केजरीवालांचं नाव नाहक गुंतवलं) तो अरविंदो फार्माचा शरच्चंद्र रेड्डी, जामिनावर बाहेर...ती ५५ कोटींची भरभक्कम लाच स्वीकारणारा 'भाजपा' (रक्कम–साधर्म्यामुळे '५५ कोटींचे बळी'फेम गोपाळ गोडसे, इथे हटकून आठवायला हवा; कारण, तो यांच्याच मातृसंस्थेशी जवळून संबंधित)...सत्तेच्या सिंहासनावर आणि ज्यांचा, या दारु–घोटाळ्याशी काडीचाही संबंध नाही...ते दिल्लीचे ३ वेळचे अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मात्र तुरुंगात...??? त्या अण्णा हजारेंना एवढ्या काळानंतर अचानक कंठ फुटलाय आणि हा, सोयिस्कर–मौन बाळगणारा प्राणी, पुन्हा या प्रकरणाच्या निमित्ताने बरळू लागलाय....घोर कलियुग, यालाच म्हणायचं...तर मग, अवतार 'विष्णु'चा म्हणायचा की, 'हिरण्यकश्यपु'चा?*

***...राजन राजे***
*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*


Rajan Raje - राजन राजे ... · 16m
"तुरुंगातून टोळ्या चालवल्या जातात...सरकार नाही", असं वात्ताडन करणारा भाजपा खा. मनोज तिवारी, हे सोयिस्कररित्या विसरला की, 'तुरुंगातून टोळ्या चालवल्या जाण्या'ची परिस्थिति भारतात मौजूद असेल; तर, मग त्यांचे 'विश्वगुरु' तथा 'विष्णूचे अवतार' करतायत तरी काय? किस काम के है वो?
@INCIndia





*'रोल्टा इंडिया लिमिटेड', अंधेरी, मुंबई या कंपनीतील भारतीय कामगार सेनेचे सदस्य असलेल्या पीडित कामगारांनी 'धर्मराज्य कामगार कर्मचारी-महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची, त्यांच्या ठाणे येथील कार्यालयात भेट घेऊन, आपल्यावर झालेल्या अन्यायाची व्यथा मांडली. त्यावर मा. राजन राजे यांनी, पीडित कामगारांच्या व्यथा जाणून घेत, त्यांच्याशी सकारात्मक चर्चा करुन, त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरोधात कायदेशीर आणि सनदशीरमार्गाने संघर्ष करीत, न्याय्य मिळवून देण्याचे आश्वासन दिले.*

---

महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्रीमंत शिवछत्रपती महाराजांच्या (मराठी तिथीप्रमाणे) जयंतीनिमित्त, दि. २८ मार्च-२०२४ रोजी, ठाणे शहराच्या मासुंदा तलावात असलेल्या शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्यास 'इंडिया आघाडी'च्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, शिवछत्रपतींना वंदन केले. याप्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे लोकसभा खासदार श्री. राजन विचारे, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदार दिघे, ठाणे शहरप्रमुख श्री. प्रदीप शिंदे, ठाणे शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. विक्रांत चव्हाण यांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि संभाजी ब्रिगेडचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.





भांडवलदारांचा (प्रायः सुसंघटित गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाचा) राजकारण व सरकारी-धोरणांतील हस्तक्षेप एवढ्या टोकाला गेलाय की, देशातील कामगारविषयक धोरणं आखणं किंवा कॉर्पोरेटीय-सवलती (उदा. कॉर्पोरेट-करामध्ये वा निसर्ग-पर्यावरणीय निर्बंधांमध्ये सवलती) उपटणं, इथपर्यंतच तो मर्यादित राहिलेला नाही...तर, थेट विशिष्ट राज्याचा मुख्यमंत्री कोण व्हावा, देशाचा पंतप्रधान कोण व्हावा; हे ही बडे उद्योगपतीच ठरवू लागलेत. ३० मे-१९९६ रोजी, एक बडा गुजराथी उद्योगपती, ''देवेगौडा चलेगा'' असं फोनवर म्हटल्याचं (तो कोण, याचा आपण सहजी कयास करु शकता), माझ्या परिचयातल्या एका बड्या कंपनी-अधिकाऱ्याने सकाळच्या सुमारास अगदी समोर बसून ऐकलं आणि संध्याकाळपर्यंत पंतप्रधान म्हणून त्यांचा शपथविधी-समारंभ देखील पार पडला.

---



**मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...**

## 'धर्मराज्य पक्ष'प्रणित

# 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

## या कामगार संघटनेत सामील व्हा !!!

**राजन राजे**
**(अध्यक्ष)**



**महेशसिंग ठाकूर**
**(महासचिव)**
**९७६९५ २५००६**

**रमाकांत नेवरेकर**
**(उपाध्यक्ष)**
**७२०८८ ७९१९७**



**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)